CMYK

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १९ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३३९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा मोठी उलथापालथ?

## ठाकरे गटाचे अर्धे खासदार एकनाथ शिंदेंच्या संपर्कात? लोकसभेत ताकद वाढवण्यासाठी शिवसेनेचा प्रयत्न?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १८ मार्च :** राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीचे संकेत मिळत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या दिल्ली दौऱ्यावर असून, त्यांच्या या दौऱ्यामागे उबाठा खासदारांना आपल्या पक्षात घेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे. ठाकरे गटातील जवळपास निम्माहून अधिक खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असून त्यांच्या पक्षप्रवेशाबाबत हालचालींना वेग आला आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन आगामी रणनीतीवर चर्चा केली आहे. या भेटीचा मुख्य अजेंडा ठाकरे गटाच्या खासदारांचा शिंदे गटात प्रवेश हाच असल्याचे बोलले जात आहे. संसदेत आप-



ले संख्याबळ वाढवणे आणि संघटनात्मक मजबुतीसाठी शिंदेंनी हे विशेष मिशन हाती घेतल्याचे बोलले जात आहे.केवळ चर्चाच नव्हे, तर शिंदेंनी या खासदारांच्या नावांची यादी तपासून कायदेशीर तज्ज्ञांशीही सल्लामसलत केली आहे, जेणेकरून पक्षांतराच्या वेळी कोणतीही तांत्रिक अडचण येऊ नये अशी माहिती समोर आली आहे.

दुसरीकडे, या चर्चेवर ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी कडक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. आमचे निष्ठावान लोकप्रतिनिधी कुठेही जाणार नाहीत. ज्यांनी घोटाळे केले आहेत, तेच ईडी-सीबीआयच्या भीतीने तिकडे गेले आहेत. आमच्या खासदारांना विकासनिधी दिला जात नसल्याने अडवणूक केली जात आहे, असा आरोप राऊतांनी केला आहे.

जर हे पक्षांतर झाले, तर ठाकरे गटाला लोकसभेत मोठे खिंडार पडण्याची शक्यता आहे. ठाकरे गटाचे २०२४ मध्ये ९ खासदार निवडून आले आहेत. अरविंद सावंत (दक्षिण मुंबई),अनिल देसाई (दक्षिण मध्य मुंबई),संजय दीना पाटील (ईशान्य मुंबई),संजय जाधव (परभणी),ओमराजे निंबाळकर (धाराशिव),भाऊसाहेब वाकचौरे (शिर्डी), राजाभाऊ वाजे (नाशिक), संजय देशमुख (यवतमाळ-वाशीम), नागेश पाटील-आष्टीकर (हिंगोली) यापैकी नेमके कोणते खासदार शिंदेंच्या रडारवर आहेत हे नेमके समोर आलेले नाही.

डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे (कल्याण), नरेश गणपत म्हस्के(ठाणे), रवींद्र दत्ताराम वायकर (मुंबई उत्तर पश्रि्चम), श्रीरंग अप्पा चंदू बारणे (मावळ), प्रताप-राव गणपतराव जाधव - (बुलढाणा) संदीपनराव आसाराम भुमरे -(संभाजीनगर),धैर्यशील संभाजीराव माने(हातकणंगले), हे खासदार शिंदेंच्या नेतृत्वात निवडून आले आहेत. जर उबाठाचे खासदार शिंदेंसोबत आले तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाची दिल्लीत ताकद वाढू शकते.

## थोडक्यात...

### अपघातात तीन ठार

रायगड : मुंबई-पुणे महामार्गावर बुधवारी सकाळी भीषण अपघात घडून तिघांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत एकूण पाच वाहने एकमेकांना धडकली असून अपघाताची तीव्रता मोठी होती. पुण्यावरून मुंबईला जाताना नव्या सुरू झालेल्या बोगद्याच्या खोपोलीकडील एक्झिटवर हा अपघात झाला. यावेळी पाच वाहनांच्या धडकेत कंटेनर एका चारचाकीवर पलटल्यामुळे गाडीतील तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. सकाळी पुण्याहून मुंबईच्या दिशेने येताना ९.४० च्या सुमारास हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. भरधाव वेगात असलेल्या वाहनांमध्ये अचानक ब्रेक लागल्याने मागून येणाऱ्या वाहनांनी एकमेकांना जोरदार धडक दिली. या साखळी अपघातात एक कंटेनर अनियंत्रित होऊन समोरच्या चारचाकी वाहनावर उलटला. त्यामुळे चारचाकीतील तिघांचा जागीच मृत्यू झाला.

### सागवान तस्करांचा धुमाकूळ

मुंबई : नक्षलग्रस्त भागातील मौल्यवान सागवान लाकडाची तस्करी करणार्या संघटित टोळ्यांना राजकीय पाठबळ मिळत आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी विधानसभेत केला. त्यावर वनमंत्री गणेश नाईक यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी मतदारसंघात तस्करांना पकडणार्या वनविभागाच्या प्रामाणिक अधिकार्यांना एका स्थानिक नेत्याकडून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली जाते आणि तस्करांना सोडवण्यासाठी दबाव टाकला जातो, असा आरोप वडेट्टीवार यांनी प्रश्नोत्तराच्या तासात केला. याला उत्तर देतांना वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, ज्या अधिकार्यांनी राजकीय दबावाखाली येऊन तस्करांना सोडून दिले, त्यांची सखोल चौकशी करून त्यांना कठोर शासन केले जाईल.

### वाहन कर विधेयकात सुधारणा

मुंबई : राज्यातील पर्यावरण संरक्षण, आर्थिक शिस्त आणि औद्योगिक विकास यांचा समतोल साधण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणारे महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६ आज विधिमंडळात एकमताने मंजूर करण्यात आले. या विधेयकाद्वारे वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी जुन्या आणि प्रदूषणकारी वाहनांवरील पर्यावरण करात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

### सुनेत्रा पवारांनी घेतले समाधीचे दर्शन

पुणे : छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३३७ व्या बलिदान स्मरणदिनानिमित्त राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी तुळापूर येथील समाधीस्थळी जाऊन अभिवादन केले आणि समाधीचे दर्शन घेतले. यावेळी आमदार ज्ञानेश्र्वर कटके, आमदार बापुसाहेब पठारे, जिल्हा परिषद सदस्य किरण साकोरे, मोनिका हरगुडे, पंचायत समिती सदस्य, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, अपर तहसीलदार तृप्ती कोलते, शिरुरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, व कृष्णा आरगडे, ड. गुंफा इंगळे आदी उपस्थित होते.

### घरगुती सिलेंडरचा व्यावसायिक उपयोग

कोल्हापूर : जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील अतिग्रे परिसरात घरगुती गॅस टंचाई असताना व्यावसायिकांनी शासनाचे नियम मोडले आहेत. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी पुरवठा विभागाला धाडी टाकण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पुरवठा अधिकारी दिनेश आडे यांच्या पथकाने रुकडी फाट्यावरील बिकानेर बेकरीतून ३ आणि घोडावत विद्यापीठाशेजारील हॉटेल राज प्युअर व्हेजमधून २ घरगुती गॅस सिलेंडर जप्त केले आहेत.

### रेल्वे स्थानकाची कनेक्टिव्हिटी वाढणार

मुंबई : मुंबईत बुलेट ट्रेनचं काम सध्या सुरू आहे. हे स्थानकं तयार होताच नागरिकांना शहरातीस इतर वाहतुकीच्या पर्यायांचा सहजपणे उपयोग करता येईल यासाठी बुलेट ट्रेनच्या स्थानकांपासून कनेकटीव्हिटी वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे. ही सर्व स्थानकं शहरातील वाहतूक व्यवस्थेला जोडून तयार केली जाणार आहेत.

### रवी पुजारी पोलिसांच्या ताब्यात

ठाणे : खंडणीसह अन्य विविध गंभीर गुन्ह्यांची नोंद असलेला कुख्यात गुंड रवी पुजारी याला ठाणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुजारीला ताब्यात घेण्यासाठी पोलिसांचे पथक बेंगळुरू येथे गेले होते.

## महानगरपालिकांनाही प्लास्टिक फुलांच्या बाजारावर कारवाईचे अधिकार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### प्लास्टिक फुलांच्या बंदीसाठी विशेष अधिसूचना काढणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १८ मार्च :** र राज्यात प्लास्टिक बंदी अस्तित्वात असली तरी बाजारपेठेत कृत्रिम (प्लास्टिक) फुलांचा वाढता वापर शेतकऱ्यांच्या नैसर्गिक फुलांच्या व्यवसायावर परिणाम करत आहे. प्लास्टिक फुलांच्या बंदीसाठी विशेष सूचना काढण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य प्रविण दरेकर यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य शशिकांत शिंदे, अमित गोरखे, अमोल मिटकरी, सदाभाऊ खोत, अनिल परब यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्लास्टिक बंदीच्या विद्यमान अधिसूचनेअंतर्गतच विशेष अधिसूचना काढून प्लास्टिक व कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्यात येईल. महानगरपालिकांना अशा प्रकारच्या बाजारपेठांवर कारवाई करण्याचे अधिकार दिले जाणार असून, प्लास्टिक फुलांचा वापर करणाऱ्या डेकोरेशन व्यावसायिक, बँक्वेट हॉल्स आणि इतर संबंधित घटकांनाही नोटिस दिली जाईल. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

याबाबत अधिक माहिती देताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल बंदी अधिसूचना २०१८ नुसार सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक आणि थर्माकोलवर पूर्णतः बंदी आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने २९ ऑगस्ट २०२५ रोजी सण-उत्सव काळात कृत्रिम फुलांचा वापर टाळण्याबाबत परिपत्रक जारी केले आहे. एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत १,२४,७८३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली यापैकी ३,३९० आस्थापनांवर कारवाई करण्यात येऊन १.५५ कोटी दंड वसूल करण्यात आला असून ६७.५४ मेट्रिक टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

## चीनची युद्धात उडी? अमेरिका, इस्त्रायलचे धाबे दणाणले, आता भयंकर युद्ध होणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** युद्धामुळे मध्य पूर्वेत मोठा तणाव निर्माण झाला आहे. इराणकडून इस्त्रायल आणि अमेरिकेवर मिसाईल हल्ले सुरूच आहेत. इराणच्या हल्ल्यांमुळे इस्त्रालयमध्ये हाहाकार उडाला आहे. तर इराण सैन्य तळांवर इतके अचूक हल्ले कसे काय करू शकतो? असा प्रश्न अमेरिकेला पडला आहे. यावरून काही दिवसांपूर्वीच अमेरिकेनं रशियावर आरोप केला होता. रशिया इराणला आमच्या सैन्य तळांची गुप्त माहिती पुरवत असल्याचं अमेरिकेनं म्हटलं होतं. मात्र रशियानं अमेरिकेचे हे आरोप फेटाळून लावले आहेत. त्यानंतर आता अमेरिकेतून एक धक्कादायक रिपोर्ट समोर आला आहे. या रिपोर्टमुळे जगभरात खळबळ उडाली आहे.

अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये भीषण युद्ध सुरू आहे. या युद्धामुळे मध्य पूर्वेत मोठा तणाव निर्माण झाला आहे. या तणावादरम्यान आता अमेरिकेमधून एक रिपोर्ट समोर आला आहे.

## दिल्ली, इंदूरमधील आगीच्या दुर्घटनांबद्दल पंतप्रधान मोदींकडून शोक व्यक्त

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीतील पालम आणि मध्य प्रदेशातील इंदूर येथे वेगवेगळ्या आगीच्या दुर्घटनांबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. पीडित कुटुंबांसाठी आर्थिक मदतही जाहीर करण्यात आली आहे.

पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधानांनी दोन्ही घटनांना दुःखद म्हटले असून, या कठीण काळात शोकाकुल कुटुंबांप्रति आपल्या संवेदना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी जखमींना लवकरात लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. इंदूरमधील घटनेबाबत, पंतप्रधान कार्यालयाने 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, आगीमुळे झालेल्या जीवित आणि मालमत्तेच्या नुकसानीमुळे पंतप्रधान अत्यंत दुःखी आहेत. पंतप्रधान म्हणाले की, ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्यांच्याप्रती माझ्या संवेदना आहेत. मी जखमींच्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो. तसेच, पंतप्रधान राष्ट्रीय सुरक्षा दलाकडून (झचछठऋ) प्रत्येक मृताच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची सानुग्रह मदत जाहीर करण्यात आली आहे.

दिल्लीतील पालम भागातील राम मार्केटमधील एका चार मजली इमारतीला आग लागली. इमारतीच्या तळघर, तळमजला आणि पहिल्या मजल्यावर कपडे आणि सौंदर्यप्रसाधनांचे शोरूम होते, तर वरच्या दोन मजल्यांवर एक कुटुंब राहत होते. आग इतक्या वेगाने पसरली की रहिवाशांना बाहेर पडता आले नाही, यात किमान सहा जणांचा बळी गेला आहे.मध्य प्रदेशातील इंदूरमध्येही अशीच एक दुःखद घटना घडली. बंगाली स्क्वेअरमधील ब्रिजेश्र्वरी कॉलनीत कार चार्ज करताना शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागली. आगीने संपूर्ण घराला वेगाने वेढले. घरात ठेवलेल्या गॅस सिलिंडरलाही आग लागली, ज्यामुळे एकापाठोपाठ एक स्फोट झाले आणि घराचा काही भाग कोसळला. या घटनेत किमान आठ जणांचा मृत्यू झाला आहे.

## जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापनात त्रुटी ठेवणार नाही: पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १८ मार्च :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम (घएच्), नायर आणि कूपर या प्रमुख रुग्णालयांमधील जैववैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत आज विधान परिषदेत आमदार मिलिंद नार्वेकर यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रशासकीय वस्तुस्थिती स्पष्ट करत सरकार या विषयावर गंभीर असल्याचे सांगितले.

विधान परिषदेच्या कामकाजादरम्यान आमदार मिलिंद नार्वेकर यांनी मुंबईतील पालिकेच्या रुग्णालयांमध्ये निर्माण होणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्याचा मुद्दा उचलून धरला. रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा साचत असून त्याची



शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जात नसल्याने रुग्ण आणि सामान्य नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याकडे नार्वेकर यांनी लक्ष वेधले. विशेषतः केईएम, नायर आणि कूपर यांसारख्या मोठ्या रुग्णालयांमधील विदारक परिस्थिती त्यांनी सभागृहात मांडली.

या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री पंकजा मुंडे यांनी वस्तुस्थिती मांडली. त्यांनी स्पष्ट केले की, रुग्णालयातील कचरा व्यवस्थापनासाठी निविदा प्रक्रिया आणि संबंधित कंत्राटदारांच्या कामावर सरकारचे बारीक लक्ष आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जात आहे. ज्या ठिकाणी त्रुटी आढळतील, तिथे कठोर कारवाई केली जाईल, असे आश्र्वासन पंकजा मुंडे यांनी दिले. तसेच, पालिका प्रशासनाला या संदर्भात कडक निर्देश देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

## मुंद्रा बंदरात ८०,८८६ मेट्रिक टन कच्चे तेल घेऊन 'जग लाडकी' जहाज दाखल

**गांधीनगर/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय ध्वज असलेले कच्चे तेल वाहून नेणारे जहाज 'जग लाडकी' गुजरातच्या मुंद्रा बंदरात यशस्वीरित्या दाखल झाले असून, ऊर्जा संकटाच्या काळात दिलासा मिळाला आहे. हे जहाज अंदाजे ८०,८८६ मेट्रिक टन कच्चे तेल घेऊन बंदरात दाखल झाले. हे कच्चे तेल संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधून आयात करण्यात आले आणि जहाज फुजैराह बंदर येथे भरले गेले होते.

या जहाजाची एकूण लांबी २७४.१९ मीटर आणि रुंदी ५०.०४ मीटर आहे. या टँकरचे डेडवेट टनेज (एकूण भार वाहून नेण्याची क्षमता) अंदाजे १,६४,७१६ टन आणि ग्रॉस टनेज अंदाजे ८४,७३५ टन आहे.

या जहाजाचे मुंद्रा बंदरातील आगमन, मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाची आयात हाताळण्यात अदानी पोर्ट्सच्या सुविधांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करते. अशा



प्रकारची वाहतूक प्रमुख रिफायनरी कंपन्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे, कारण त्या आपले कामकाज अखंडित ठेवण्यासाठी आणि भारताची ऊर्जा सुरक्षा मजबूत करण्यासाठी या मालवाहतुकीवर अवलंबून असतात.

यापूर्वी, भारतीय ध्वज असलेल्या दोन एलपीजी वाहक जहाजांनी १६ आणि १७ मार्च रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे प्रवास करून भारतात आगमन केले होते. एमटी शिवालिक आणि एमटी नंदा देवी या जहाजांनी, अंदाजे ९२,७१२ मेट्रिक टन एलपीजी घेऊन शुक्रवारी (१३ मार्च) सकाळी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास केला.

आपल्या व्यावसायिक हितांचे रक्षण करण्यासाठी, भारत ऑपरेशन संकल्प अंतर्गत या प्रदेशातील सागरी हद्दीत सतत नौदल उपस्थिती राखतो. हा उपक्रम महत्त्वाच्या सागरी मार्गांची सुरक्षा सुनिश्र्चित करण्यासाठी आणि जग लडकीसारख्या जहाजांचे सुरक्षित आगमन शक्य होते.

## तृणमूल काँग्रेसचे सर्व उमेदवार जाहीर

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी तृणमूल काँग्रेसनं सगळ्या जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. ममता बॅनर्जी त्यांच्या बालेकिल्ल्यातून म्हणजेच भवानीपूरमधून निवडणूक लढवतील. त्यांचा सामना विरोधी पक्षनेते शुभेंदु अधिकारी यांच्याशी होईल. अधिकारी मागील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये गेले. त्याआधी ते तृणमूल काँग्रेसमध्ये होते. ममता बॅनर्जी यांच्या मंत्रिमंडळात कार्यरत होते. गेल्या निवडणुकीत त्यांनी ममता बॅनर्जी यांचा अटीतटीच्या लढतीत पराभव केला होता.

मागील निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या समोर भाजपनं सुवेंदु अधिकारी यांना तिकीट दिलं होतं. आता तीच रणनीती तृणमूल काँग्रेसनं वापरली आहे. ममता बॅनर्जी यांनी नंदिग्राम मतदारसंघात अधिकारी यांची कोंडी करण्यासाठी त्यांचेच सहकारी असलेल्या पबित्र कर यांना उमेदवारी दिली आहे. पबित्र कर हे भाजपचे माजी नेते आहेत. तृणमूल-भाजप-तृणमूल असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. अधिकारी यांचे निकटवर्तीय मानल्या जाणाऱ्या कर यांची घरवापसी घडवून आणत ममता बॅनर्जी यांनी भाजपला धक्का दिला आहे.

सुवेंदु अधिकारी यांच्या शिष्याला गळाला लावत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यांच्याच माजी सहकाऱ्याला धक्का दिला आहे. पबित्र कर यांनी मंगळवारी तृणमूल काँग्रेसमध्ये घरवापसी केली. यानंतर पक्षानं अधिकारी यांच्या विरोधात त्यांची उमेदवारी जाहीर केली. ते नंदिग्राममधून विधानसभा निवडणूक लढवतील. २०२१ मध्ये



बंगाल विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांनी कधीकाळी त्यांचे निकटवर्तीय राहिलेल्या सुवेंदु अधिकारी यांनी आव्हान देत नंदिग्राम मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. हा मुकाबला अतिशय चुरशीचा झाला. या लढतीत अधिकारी यांनी तृणमूलच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांचा जवळपास १९०० मतांनी पराभव केला. यानंतर तृणमूलचे भवानीपूरचे सोवनदेव चट्टोपाध्याय यांनी ममता बॅनर्जी यांच्यासाठी आमदारकीचा राजीनामा दिला होता. त्यामुळे इथे पोटनिवडणूक झाली. त्यात ममता बॅनर्जी यांनी विजय मिळवला. मागील निवडणुकीत नंदिग्राममध्ये ममता बॅनर्जी विरुद्ध सुवेंदु अधिकारी असा सामना रंगला होता. आता हाच सामना भवानीपूर मतदारसंघात होणार आहे. नंदिग्राम मतदारसंघ सुवेंदु अधिकारी यांचा बालेकिल्ला मानला जातो. गेल्या निवडणुकीत ममता बॅनर्जी यांनी अधिकारी यांना त्यांच्याच मतदारसंघात आव्हान दिलं होतं. यंदा त्या उलट चित्र आहे. यावेळी अधिकारी भवानीपूरमध्ये बॅनर्जी यांना आव्हान देतील.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मार्चअखेर सुट्ट्यांच्या दिवशीही दुय्यम निबंधक कार्यालये सुरू राहणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवसांमध्ये मालमत्ता नोंदणीला मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता, २६, २८, २९ आणि ३१ मार्च २०२६ या चार सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

आर्थिक वर्ष संपुष्टात येत असल्याने व नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला लोकांच्या मालमत्ता खरेदी-विक्रीकडे अधिक कल असतो. यामुळे दस्तऐवज नोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असून, इष्टांक पूर्ती, अभिनिर्णय, कमी पडलेले मुद्रांक शुल्क वसुली इत्यादी कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी या सुट्टीच्या दिवशीही कार्यालये कार्यान्वित राहतील. याशिवाय, सह दुय्यम निबंधक कार्यालय, लातूर क्रमांक १ हे कार्यालय नियमितपणे शनिवार व रविवार सुरू असते. त्यामुळे या कार्यालयाची साप्ताहिक सुट्टी सोमवार व मंगळवार असते. परंतु मार्च अखेरच्या कालावधीत मंगळवार हा दिवसही कार्यालय सुरू राहील. सर्व संबंधित नागरिकांनी या सुधारित वेळापत्रकाचा लाभ घ्यावा व आवश्यक दस्तऐवज नोंदणीसाठी वेळीच कार्यालयात भेट द्यावी, असे आवाहन सह जिल्हा निबंधक जी. बी. सातदिवे यांनी केले आहे.



## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग १९ व २१ मार्च रोजी बंद राहणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, १९ मार्च २०२६ (गुढीपाडवा) आणि शनिवार, २१ मार्च २०२६ (रमजान ईद) रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने बंद राहील.

तसेच रविवार, २२ मार्च २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

००००००००००००००००००

## सात वर्षीय आवेजचा पहिला रोजा



लातूर तालुक्यातील माटेफळ येथील शेख आवेज आलिफ या सात वर्षीय बालकाने रमजानच्या महिन्यातील आपला पहिला रोजा केला. त्याचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

## प्रा. मनोहर गायकवाड चिखलीकर यांची अजा मोर्चा भाजप जिल्हाउपाध्यक्षपदी नियुक्ती

**लातूर, दि. १८ मार्च :** सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक धार्मिक व ग्रंथालय क्षेत्रात कार्यरत असलेले प्रा. मनोहर गायकवाड चिखलीकर यांची भाजपा अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा



उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा अध्यक्ष व माजी समाजकल्याण सभापती लातूर रोहिदास वाघमारे यांनी ही नियुक्ती केली आहे.

या नियुक्तीचे पत्र इंजि. विश्र्वजीत अनिलकुमार गायकवाड यांच्या हस्ते नुकतेच प्रदान करण्यात आले.याप्रसंगी माजी खासदार सुनील गायकवाड, डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, रोहिदास वाघमारे, भागवत कांबळे, बाबुराव बोडके व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या निवडीचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून उपसरपंच गोविंद देशमुख कुटुंबियांचे सांत्वन



**लातूर/प्रतिनिधी :** बाभळगाव तालुका लातूर येथील उपसरपंच गोविंदराव देशमुख यांचे वडील शेषेराव देशमुख यांचे नुकतेच निधन झाले आहे या दुःखद घटनेनंतर राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी बाभळगाव येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट दिली.

शेषराव देशमुख यांच्या स्मृतिस पुष्पहार घालून अभिवादन केले व कुटुंबाचे सांत्वन केले धीर दिला.

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील बाभळगाव येथील हणमंत देशमुख विठ्ठल देशमुख, दत्ता देशमुख बालाजी देशमुख , एन आर देशमुख ,महादेव देशमुख, उपसरपंच गोविंदराव देशमुख, अशोक नाडागुडे, भीमा शिंदे, गोपाळ थडकर, तांनाजी जाधव अविनाश देशमुख निखील देशमुख यांच्यासह ग्रामस्थ देशमुख कुटुंबातील सदस्य उपस्थित होते

# लातुरात शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन : डॉ. मिलिंद पोतदार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** लातूरच्या सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च च्या द्विदशकपूर्तीचे औचित्य साधून शिक्षकांसाठी 'विद्यार्थ्यांची मानसिकता : शिक्षकांना काय माहिती असायला हवे' या विषयावरील विशेष कार्यशाळेसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. मुग्धा पोतदार यांनी दिली.समाजात वावरताना प्रत्येकाला ताणतणावाचा सामना करावाच लागतो. त्यामुळे सरासरी दहापैकी चार जणांना समुपदेशनाची नितांत गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आरोग्यसेवेसोबतच सामाजिक कार्यातही आपला खारीचा वाटा उचलण्याचे काम आपण सातत्याने करत असून येत्या शनिवार दि. २१ मार्च २०२६ रोजी दुपारी अडीच वाजता लातूर आणि परिसरातील शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळा डॉ. भूषण शुक्ल यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या कस्तुर कांचन सभागृहात होणार आहे. या कार्यशाळेसाठी ८५ शाळांमधील प्रत्येकी दोन शिक्षकांना निमंत्रित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रविवार दि. २२ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता हॉटेल ग्रँड येथे बालरोगतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ आणि न्यूरोलॉजिस्ट यांच्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी पाच वाजता दगडोजीराव देशमुख सभागृहात पुण्याचे प्रसिद्ध बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांच्या प्रमुख उपस्थितीत ' तंत्रज्ञान युगातील पालकत्व - कानगोष्टी पालकत्वाच्या ' या विषयावर पालकशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'मानसिक आरोग्य विषयावरील निबंध स्पर्धा आणि रिल्स स्पर्धा' यांच्या विजेत्यांचा गौरवदेखील करण्यात येणार आहे.



त्याचप्रमाणे दि. २८ व २९ मार्च रोजी दोन दिवसीय नाट्यमहोत्सव आयोजित केला आहे. यामध्ये आनंद ओवरी, मन (संवेदनशील मनाची स्पंदने), मग तू मला खा, तो राजहंस एक या नाटकांचे प्रयोग सादर होणार आहेत. प्रत्येक दिवशी दोन नाटके सादर केली जाणार असल्याचे डॉ. पोतदार यांनी सांगितले. आपल्या हॉस्पिटलमध्ये आजमितीस मानसिक आजाराच्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. आपल्या देशात १० ते १२ हजार मानसोपचार तज्ज्ञ उपलब्ध असून ताणतणावांसह विविध प्रकारच्या मानसिक कारणावरून किमान १५ ते १८ कोटी लोकांना कोणत्या ना कोणत्या उपचाराची आवश्यकता भासू शकते.त्यामुळे मानसिक आरोग्यावरही प्राधान्याने विचार होणे गरजेचे असल्याचे डॉ. पोतदार यांनी सांगितले.

## अवकाळी पाऊस व गारपिटीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** लातूर, धाराशिव जिल्ह्यांसह मराठवाड्यातील अनेक ठिकाणी झालेल्या वादळी वारा, पाऊस आणि गारपिटमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे फळबागा, भाजीपाला आणि रब्बी पिके उद्ध्वस्त झाली असून, प्रशासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई जाहीर करावी, अशी मागणी राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे.माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, या अगोदर २२ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस झाला होता, ज्यातून रब्बी पिके कशीबशी वाचली होती. मात्र, काल १७ मार्च रोजी पुन्हा झालेल्या गारपिटमुळे हाताशी आलेली पिके पूर्णतः जमीनदोस्त झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने काढणीला आलेली ज्वारी, गहू, हरभरा आणि करडई या पिकांचा समावेश आहे. तसेच आंबा, द्राक्ष बागा आणि भाजीपाल्याचीही मोठी नासाडी झाली आहे. शासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन प्रशासनाला तात्काळ पंचनाम्यांचे आदेश द्यावेत आणि शेतकऱ्यांना ठोस दिलासा द्यावा.

प्रशासनाने सतर्क राहून जागृती करावी

हवामान खात्याच्या अंदाजानुसार २०-२१ मार्चपर्यंत विदर्भ आणि मराठवाड्यात पुन्हा अवकाळी पाऊस व गारपीट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने शेतकरी वर्गामध्ये व्यापक जनजागृती करावी, जेणेकरून संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतकरी पूर्वतयारी करू शकतील, असेही आमदार अमित विलासराव देशमुख यांनी प्रशासनाला सुचवले आहे.

## देऊळवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सर्व रोग निदान शिबिर व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**लातूर, दि. १८ मार्च :** उदगीर तालुक्यातील आदर्श गाव देऊळवाडी येथे श्री समर्थ सद्गुरू धोंडूतात्या महाराज यांच्या ९४ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह रविवार दि. १५ मार्च २०२६ ते रविवार दि. २२ मार्च २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावाने साजरा होत असून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाच्या औचित्य साधून शुक्रवार दि. २० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत समर्थ धोंडूतात्या मंदिर, देऊळवाडी येथे सर्व रोग निदान शिबिर व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या आरोग्य शिबिरामध्ये विविध आजारांवरील तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. संतोष गुट्टे (तहसीलदार, खुलताबाद) तसेच एकनाथ नागरगोजे (पोलीस उपनिरीक्षक, वैजापूर) हे उपस्थित राहणार आहेत.

या शिबिरामध्ये डॉ. विजय बिराजदार (एमबीबीएस, एमएस ऑर्थो), डॉ. राधिका बिराजदार (एमबीबीएस, डीजीओ), डॉ. हर्षवर्धन जाधव (एमबीबीएस, एमडी मेडिसिन), डॉ. उबेद शेख



(एमबीबीएस, डीसीएच), लायन्स क्लब उदगीरचे वैद्यकीय तज्ञ, डॉ. अस्मिता पाटील (वैद्यकीय अधिकारी, नळगीर), डॉ. माधव मठपती (बीडीएस) व डॉ. निवेदिता मठपती (बीडीएस) हे तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत.

अखंड हरिनाम सप्ताहात दररोज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, शिवपुराण कथा, हरिपाठ, हरी कीर्तन, संगीत भजन व हरीजागर तसेच पहाटे काकडा आरती असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

शिबिराचे आयोजन कै. त्र्यंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठान, उदगीर यांच्या वतीने करण्यात आले असून या शिबिरास मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन माळेवाडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबसप्पा माळेवाडे, उपाध्यक्ष संजय राजुळे, अखंड हरिनाम सप्ताह कमिटी देऊळवाडी तसेच ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय देऊळवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या वतीने चिखुर्ड्यात शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या वतीने लातूर तालुक्यातील चिखुर्डा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास लातूर पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण, पं. स. सदस्य बाळासाहेब कदम, जि. प. सदस्य दत्तात्रय वैजनाथराव शिंदे, लातूर शहर महानगरपालिकेचे नगरसेवक तथा क्लबचे सदस्य गिरीश ब्याळे, क्लबचे सचिव डॉ. नेताजी शिंगटे, प्रेसिडेंट इलेक्ट अॅड. नागेश स्वामी, सुदर्शन कांबळे, आंबेकर, चंद्रकांत गुंडरे, साहेबराव मोरे, गावचे सरपंच, केंद्रप्रमुख दयानंद आवारे, संतोष जगताप (तंटामुक्ती अध्यक्ष), माजी सरपंच आनंद कदम, अॅड. प्रशांत कदम आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना



आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना सभापती श्रीकांत बैले यांनी विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारच्या पुढाकाराबद्दल रोटरी क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. रोटरीचा सामाजिक कार्यात सातत्याने सहभाग असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

याप्रसंगी जि. प. प्राथमिक शाळा चिखुर्डा येथील मुख्याध्यापक गायकवाड, शिवणे, सहशिक्षिका जगताप मॅडम, वडार वस्ती शाळेच्या मुख्याध्यापिका देशमुख मॅडम, अंगणवाडी ताई मानेमॅडम, श्रीमती काशीद मॅडम, श्रीमती कांबळे मॅडम, श्रीमती लहाने मॅडम, श्रीमती गवळी मॅडम तसेच ग्रामसेवक भुजबळ, गोरोबा कापसे, जालिंदर हुडे, विश्र्वजीत कदम, ऋषिकेश मुटकुळे, रवींद्र ढोले, लक्ष्मण घाडगे, प्रदीप कापसे, काकासाहेब कुंभार, शरद हुडे, कपिंद्र घाडगे, दिलीप कुंभार, दत्तात्रय घाडगे, दीपक घाडगे, अनिल कापसे, महादेव घाडगे, प्रभाकर गवळी, गणेश गवळी, दिलीप गिरी आदींची उपस्थिती होती.

# सनरीच माहेश्वरी प्रिमिअर लीग स्पर्धेचे विजेतपद निर्मल ग्लॅडिएटर्सने पटकावले, महिला संघाचे जेतेपद शिवास स्ट्रायकर्सने जिंकले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** लातूर जिल्हा माहेश्वरी युवा संगठन, युवा माहेश्वरी एवं किशोरी मंडळाच्या सनरीच एमपीएल (माहेश्वरी प्रिमिअर लीग) स्पर्धा २०२६ चे पुरुषांच्या संघाचे

विजेतेपद निर्मल ग्लॅडिएटर्सने पटकावले. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या सामन्यात महिला संघाचे जेतेपद शिवास स्ट्रायकर्सने जिंकले. या स्पर्धांना प्रेक्षकांचा अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

सनरीच एमपीएल २०२६ च्या पुरुषांच्या स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या क्रिकेट ग्राऊंडवर पार पडल्या. या स्पर्धेचा अंतिम सामना आशिष सोमाणी यांच्या निर्मल



ग्लॅडिएटर्स आणि रंजन बाहेती यांच्या राजश्री मोनार्क्स या दोन संघात झाला. यामध्ये निर्मल ग्लॅडिएटर्स विजयी ठरला. राजश्री मोनार्क्स ला उपविजेतेपद मिळाले. महिलांचे सामने ग्रँडस्लॅम टर्फवर खेळविण्यात आले. महिला संघाचा अंतिम सामना शिवास स्ट्रायकर्स विरुद्ध राजमुंद्रा वॉरियर्स यांच्यात झाला. यात शिवास स्ट्रायकर्सने जेतेपद पटकावले. या स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ व खिलाडूवृत्तीने प्रदर्शन केले. या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक सनरीच कंपनी हे होते. तर सह प्रायोजक म्हणून धनराज सॉल्व्हेक्स, मुंदडा इंटेरिओ,इंदू टाईल्स, वेंकटेश सिरॅमिक्स, सुनंदा सोलार पॉवर यांनी जबाबदारी सांभाळली.

सनरीच एमपीएलच्या सर्व स्पर्धांना क्रिकेट रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पुरुष व महिला खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून लातूरकरांनी मने जिंकली. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रोजेक्ट चेअरमन अमित भुतडा, आलोक बाहेती, पुष्कर तोष्णीवाल, निकुंज भुतडा, एड. योगेश मालपाणी, अमित भुतडा, प्रांजल डागा, अभिषेक मुंदडा, सीए गिरीश सोनी, सीए अभिषेक डागा, केदार मुंदडा, कृष्णा लाहोटी, कृष्णा सोनी, महेश तोष्णीवाल, सीए निलेश चांडक, रोहन सोनी, रुपेश हेड्डा, संस्कृती लोया, रितेश रांदड, गौरव बाहेती, रामजी भुतडा, विशाल काबरा, दीपक बजाज यांसह लातूर जिल्हा माहेश्र्वरी युवा संगठन, युवा माहेश्वरी एवं किशोरी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### गुढीपाडव्यानिमित्त विशेष ऑफर्स

**मुंबई :** गुढीपाडवा, जो महाराष्ट्रीयन नवीन वर्ष आणि वसंत ऋतूच्या आगमनाचे प्रतीक आहे, हा सण नवीन सुरुवात, समृद्धी आणि उद्घाटनांशी जोडलेला आहे. पारंपरिकरित्या, सोन्याचे दागिने घरी आणण्यासाठी हा सर्वात शुभ प्रसंगांपैकी एक मानला जातो, जे केवळ संपत्तीच आणत नाहीत, तर सकारात्मक ऊर्जा आणि वर्षाच्या उज्ज्वल सुरुवातीचे प्रतीक देखील आहेत.या नवीन वर्षाच्या निमित्ताने, सेन्को गोल्ड अँड डायमंड्स दागिन्यांचा एक विचारपूर्वक तयार केलेला आणि खास संग्रह सादर करत आहे, जो परंपरा, कारागिरी आणि आधुनिक डिझाइनचा सुंदर मिलाफ साधतो. हे दागिने जीवनातील विशेष आणि अविस्मरणीय क्षण साजरे करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत, मग ती नवीन वर्षासाठी केलेली नवीन खरेदी असो, कौटुंबिक सोहळे असोत किंवा वैयक्तिक महत्त्वाचे टप्पे असोत.

### नोंदणीकृत ट्रेडमार्कचा अनधिकृत वापर

**पुणे :** जेएसडब्ल्यू स्टीलची पूर्ण मालकीची उपकंपनी आणि भारतातील आघाडीच्या स्टील उत्पादकांपैकी एक असलेल्या जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेडने, आपल्या नोंदणीकृत ट्रेडमार्कचा अनधिकृत वापर करणाऱ्या अनेक कंपन्यांविरुद्ध माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या (व्यावसायिक विभाग) कडून दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी यशस्वीरित्या एकतर्फी अंतरिम मनाई हुकूम मिळवला आहे.हा मनाई हुकूम रामलाल लखाजी देवासी, मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्स आणि मेसर्स चामुंडा स्टीलचे मालक; हितेश देवासी, मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्सचे मालक; बागदाराम लखारामजी देवासी, मेसर्स चामुंडा स्टील आणि आकाश स्टील पॉईंटचे मालक यांच्याविरुद्ध देण्यात आला आहे. हे सर्व महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्याच्या लासलगाव आणि मनमाड परिसरातून कार्यरत आहेत.

### विवोने टी५ एक्स ५जीलाँच केला

**पुणे :** विवो इंडियाने आज टी ५ सीरीजमधील पहिला स्मार्टफोन – विवो टी५ एक्स ५जी लाँच केला. विशेषतः परफॉर्मन्सला प्राधान्य देणाऱ्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन केलेल्या विवो टी५ एक्स मध्ये ७२०० मिलीअँपिअर-तास बॅटरी आहे, जी दीर्घकाळ वापरासाठी तयार केली आहे. मीडियाटेक डायमेन्सिटी ७४०० टर्बो प्रोसेसरने सुसज्ज असलेल्या या फोनने -पर्ढीढी वर १ मिलियनपेक्षा जास्त प्रभावी स्कोअर मिळवला आहे, ज्यामुळे तो त्याच्या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोन ठरतो.

### गुढीपाडव्याचा उत्साह साजरा

गुढीपाडवा आनंद, परंपरा आणि नव्या सुरुवातींचं वचन घेऊन साजरा केला जातो. घराबाहेर पारंपरिक गुढी उभारण्यापासून ते स्वादिष्ट पदार्थ बनवण्यापर्यंत आणि आपल्या प्रियजनांसोबत एकत्र येण्यापर्यंत, पण या सणाचं खरं सौंदर्य त्या छोट्या छोट्या कृतींमध्ये दडलेलं असतं – घर सजवणं, सणाच्या जेवणाचा आनंद घेणं आणि नव्या वर्षाचं स्वागत आशा आणि कृतज्ञतेने करणं.या गुढीपाडव्याच्या निमित्ताने, सोनी सब चे कलाकार अक्षया हिंदळकर, श्रेणू पारिख, ऋषी सक्सेना, दीक्षा जोशी आणि रजत वर्मा यांनी सणाच्या उत्साहाशी आपला नातं कसं जोडलेलं आहे, तसेच परंपरा आणि आठवणींमुळे हा दिवस त्यांच्यासाठी कसा खास ठरतो, याबद्दल सांगितलं.

### एण्ड टीव्हीवरील मालिकांमधून प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची मांडणी

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्हीवरील 'घरवाली पेडवाली' आणि 'भाबीजी घर पर है २.०' या मालिकांमधून प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची प्रभावी मांडणी करण्यात येत आहे. गुढीपाडव्याच्या पार्श्र्वभूमीवर सणाचा उत्साह, परंपरा आणि कौटुंबिक नात्यांचे मूल्य यांचा समतोल साधत या मालिकांनी कंटेंट एंगेजमेंट अधिक बळकट केले आहे. प्रेक्षकांनी या धमाल आणि भावनिक क्षणांचा अनुभव घेण्यासाठी 'घरवाली पेडवाली' रात्री १० वाजता आणि 'भाबीजी घर पर है २.०' रात्री १०.३० वाजता, सोमवार ते शुक्रवार एण्ड टीव्हीवर पाहाव्यात. तसेच, सर्व भाग हिंदी झी५ प्लॅटफॉर्मवर ऑन-डिमांड उपलब्ध आहेत, ज्यामुळे व्ह्यूअर कन्व्हिनियन्स वाढविण्यात आली आहे.

# स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी सोहळा साधुसंत व शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. १८ मार्च :** वेरूळ स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराज ४३२ जन्म दिवस आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा ३३७ वा बलिदान दिवस दिनांक १८ तारखेला आल्यामुळे शहाजीराजे भोसले जयंती उत्सव समिती वेरूळ गाव आणि शिवभक्तांनी हा कार्यक्रम साध्या पद्धतीने करण्याचे ठरवले होते त्याप्रमाणे आज १८ मार्च रोजी साधू संतांच्या आणि शिवभक्तांच्या उपस्थितीत दोन्ही भोसले घराण्यातील या दोन्ही युगप्रवर्तकांना अभिवादन व आदरांजली कार्यक्रम हजारो शिवभक्त जगदुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज नाथ आश्रमाचे आक्काताई महाराज कैलास आश्रमाचे अभयानंद महाराज नागेश्र्वर नंद महाराज विवेकानंद महाराज सिद्धेश्र्वर महाराज भगत यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाला .

कार्यक्रमादरम्यान राजेंद्र पवार यांनी प्रास्ताविकात या गढीवर कार्यक्रमाचा उद्देश सांगत असताना ते म्हणाले की अठरापगड जातीला सोबत घेऊन स्वराज्य निर्मितीचा संस्कार देणाऱ्या या भोसले घराण्याच्या पवित्र गढीचे संस्कार



आज सर्व समाजापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे त्यातूनच आपला देश बलशाली आणि महाशक्ती बनू शकतो म्हणूनच या भोसले गढीवर प्रत्येक समाजातील शिवशंभुभक्ताने येणे गरजेचे आहे यासाठीच शहाजी महाराज जयंती शिवराज्याभिषेक सोहळा आणि शिवजयंती अशा वार्षिक कार्यक्रमाचेआयोजन गेल्या नऊ दहा वर्षापासून केल्या जाते..

जेणेकरून शिव विचारांचा जागर होईल एवढाच उद्देश त्यामागे आहे, सर्व शिवभक्तांचे उपस्थितीबद्दल आभार मानत यापुढे गढीवरील जयंती महोत्सव शिवराज्याभिषेक सोहळा आणि शिवजयंती सोहळ्यासाठी आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहून इतरांनाही या सोहळ्यासाठी प्रवृत्त करावे असे आवाहन राजेंद्र पवार यांनी केले.

तसेच कैलास आश्रमाचे अभयानंद गिरीजी महाराज यांनी आपल्या मनोगतात म्हटले की आज समाजामध्ये शिवविचाराची संत विचाराची जागृती होणे गरजेचे आहे म्हणूनच राजेंद्र पवार व सोहळा समिति वेरूळ गाव यांच्या प्रयत्नाला आपण सर्वांनी उपस्थिती देऊन सहकार्य करायला पाहिजे.

नाथाश्रमाच्या आक्काताई महाराज म्हणाल्या की वेरूळची भोसले गढी ही ऊर्जा देणारी आहे येथेच जनार्दन स्वामी सारखे महान संत तसेच अन्य संत याच भूमीमध्ये वास्तव्याचे कारणच हे आहे की ही भूमी तेजोमय आहे त्यामुळे आपण या भूमीमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिव विचाराची जागृती करावी ,

जगदुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी आपल्या मार्गदर्शनात राज्य शासनाला विनंती केली की शहाजीराजे महाराज छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजी महाराज तसेच समग्र भोसले घराण्याचा इतिहास शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पाठ्यपुस्तकात अभ्यासासाठी समाविष्ट करावा जेणेकरून संस्कारीत पिढी घडण्यासाठी मदत होईल राजेंद्र पवार सारखे मावळे शिवविचाराचा जागर करण्यासाठी पुढे येत आहे आपण सर्वांनी उपस्थित राहून शिवकार्य करणाऱ्याना बळ देणे गरजेचे आहे, शिवछत्रपती त्यांच्या हातून हे कार्य करून घेईल असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला , याप्रसंगी कैलास कोरडे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला या अभिवादन व आदरांजली सोहळ्याला श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल येथील शिक्षक व विद्यार्थी यांची विशेष उपस्थिती होती

कार्यक्रम सूत्रसंचालन गणपत मस्के व मच्छिंद्र देवकर पाटील यांनी केले या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर गणेश नाना आधाने, महेश उबाळे ,पुंजां अण्णा, अनिल नलावडे,, ,सागर मातकर, , संजय श्रीखंडे, जगन्नाथ काळे यास अनेक शिवभक्त स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज या दोन्ही युग प्रवर्तकांना मानवंदना व अभिवादन करण्यासाठी मालोजीराजे भोसले गडी श्री क्षेत्र वेरूळ येथे उपस्थित होते या सर्वांचे जयंती महोत्सव समितीच्या वतीने राजेंद्र पवार यांनी आभार मानले व येणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले.

## संत श्री आसाराम बापू साधक परिवारातर्फे व ह.भ.प.नाईक दादा यांच्या कृपेने सोयगाव बसस्थानक येथे मोफत पाणपोई सुरू

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १८ मार्च :** संत श्री आसाराम बापू साधक परिवारातर्फे व ह.भ.प.नाईक दादा यांच्या कृपेने अध्यक्ष राजेंद्र आहीरे व विजय आहीरे यांच्या वतीने सोयगाव बसस्थानक येथे मोफत पाणपोई सुरू करण्यात आली.तालुक्यातील खेड्यापाड्यातून येणाऱ्या नागरिकांना शुद्ध व शितल पाण्याची सेवा सुरू केली.दि.१७ मंगळवार रोजी सोयगाव वाहतूक नियंत्रक कडूबा भडके,विजय आहीरे,समाजसेवक अंकुश पगारे,गोविंद आहीरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.यावेळी वाहतूक नियंत्रक कडूबा भडके, गोविंद अहिरे,अंकुशजी पगारे,योगेश बोखारे,अमोल सोहनी,भैय्या सुर्वे, ईश्वर आगे, गोलू शिंदे,साई बोखारे सह आदी नागरिक,विविध मान्यवर उपस्थिती होते



## बिडकीन येथे ४० बालकलाकारांसह पद्मश्री पुरस्कारप्राप्त अभिनेत्री नयना आपटे यांचे भव्य बालनाट्य सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. १८ मार्च :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथे येत्या शनिवार, दि. २१ मार्च रोजी सायंकाळी सात वाजता सरस्वती भुवन विद्यालय बिडकीन मैदान, येथे एक भव्य आणि मनोरंजक बालनाट्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम माता अनुसया प्रॉडक्शन, मुंबई या गेल्या २७ वर्षांपासून कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित संस्थेच्या वतीने सादर करण्यात येत आहे.

या विशेष बालनाट्य उपक्रमामध्ये स्थानिक स्तरावरील ४० उत्साही बालकलाकारांचा सहभाग असून, त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांना एक वेगळीच आनंददायी अनुभूती मिळणार आहे. परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांचा आत्मविश्र्वास वाढविणे आणि त्यांच्यातील कलागुणांना वाव देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यक्रमा मध्ये २ बालनाट्य मनोरंजनासोबतच विद्यार्थी, पालक, समाजाला उद्देश देण्यात येईल : मला आई बाबा पाहिजे, कॉमेडी चेटकीण या नाटिकांसाठीचे ऑडिशन दि. १३ मार्च रोजी यशस्वीरित्या पार पडले, ज्यामधून एकूण ४० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे: प्रसिद्ध नाट्यकलाकार प्रविणकुमार भारदे, पद्मश्री पुरस्कारप्राप्त विनोदी अभिनेत्री नयना आपटे हे दोघेही या बालकलाकारांसोबत रंगमंचावर सादरीकरण करणार असून, प्रेक्षकांसाठी हा एक अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे. लेखक व दिग्दर्शक: प्रविण भारदे दिग्दर्शक सहकार्य: रोहित गिरी. तिकीट विक्री केंद्रे: जानकी कलेक्शन, सराफा गल्ली, मेन रोड, बिडकीन, मुकुंद मेडिकल स्टोअर, बिडकीन. आयोजकांच्या वतीने सर्व नागरिक, पालक व विद्यार्थ्यांना नम्र विनंती करण्यात येत आहे की, या बालकलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी. हा कार्यक्रम केवळ मनोरंजनासाठी नसून, बालकलाकारांच्या कलागुणांना व्यासपीठ देणारा एक प्रेरणादायी उपक्रम आहे. त्यामुळे बिडकीनकरांसाठी हा एक सुवर्णसंधी ठरणार आहे.

## उल्लेखनीय सेवा देणाऱ्या ज्येष्ठ डॉक्टरांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ मार्च :** इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे वैद्यकीय क्षेत्रात आयुष्यभर उल्लेखनीय सेवा देणाऱ्या ज्येष्ठ डॉक्टरांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. समर्थनगर येथील आयएमए सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला शहरातील ज्येष्ठ डॉक्टर, आयएमए सदस्य आणि विविध वैद्यकीय संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी प्रा. डॉ. कानन‌बाला अविनाश येळीकर, ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. दत्ता कदम आणि फॉरेन्सिक मेडिसिन तज्ज्ञ प्रा. डॉ. सय्यद अब्दुस समी यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रा. डॉ. कानन‌बाला येळीकर यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे प्रसूती व स्त्रीरोग विभागात जवळपास चार दशके सेवा देत वैद्यकीय शिक्षण, स्त्री आरोग्य आणि संशोधन क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. दत्ता कदम यांनी नवजात शिशू उपचार सेवांची सुरुवात करून हजारो बालकांना उपचार उपलब्ध करून दिले. प्रा. डॉ. सय्यद अब्दुस समी यांनी फॉरेन्सिक मेडिसिन क्षेत्रात अध्यापन आणि मेडिको-लीगल सेवेत दीर्घकाळ योगदान देत अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे होते. त्यांनी अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वाखाली आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखा विविध उपक्रम राबवत नवी दिशा घेत असल्याचे सांगितले. अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी सन्मानित डॉक्टरांच्या कार्यातून तरुण डॉक्टरांनी प्रेरणा घ्यावी असे नमूद केले.

मानद सचिव डॉ. योगेश लक्कस यांनी प्रास्ताविक केले. यावेळी आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. शेख मुर्तुजा, डॉ. पी. एम. दरक, डॉ. यशवंत गाडे, डॉ. उज्वला दहीफळे, डॉ. कुलदीपसिंग राऊळ आणि डॉ. सुभाष श्रॉफ उपस्थित होते.

पुरस्कारप्राप्त मान्यवरांच्या जीवनप्रवासाचे सादरीकरण डॉ. यशवंत गाडे, डॉ. आसावरी टाकळकर आणि डॉ. अनुपम टाकळकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना भांडेकर आणि डॉ. सोनाली सावजी यांनी केले, तर डॉ. शिवाजी पोळे यांनी आभार मानले.

### जाहीर नोटीस

लवाद प्राधिकरण

लवाद अधिकारी श्री. अमित जी चोरडिया

(मल्टी-स्टेट को.ऑप.सोसायटीज ॲक्ट २००२ चे कलम ८४ प्रमाणे व दि आर्बिट्रेशन अँड कन्सिलिएशन ॲक्ट १९९६ अन्वये)

दि.: १२/०३/२०२६

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक),अहमदनगर
पो.बॉक्स नं.-७, बँक रोड, अहमदनगर – अर्जदार
विरुध्द – खालील सामनेवाले

| लवाद अर्ज क्र. व सामनेवाला यांचे नाव व पत्ता | लवाद अर्ज रक्कम |
|---|---|
| लवाद अर्ज क्र.५३/२०२५<br>०४) सौ. प्रेमलता बद्रीनारायण बाहेती, रा.भवानीनगर,परळी वैजनाथ,ता.परळी वैजनाथ,जि.बीड ४३१५१५<br>०५) श्री.राजेंद्र विष्णुदास लाहोटी, रा.जयनगर,परळी वैजनाथ,ता.परळी वैजनाथ,जि.बीड ४३१५१५<br>(सामनेवाला नं. ०१ मे. आर जे ऑइल या भागीदारी फर्मचे जामीनदार) | रु. ५६,८४,६२९/- |

ज्यापेक्षा अर्जदार यांनी तुमचे विरुध्द रक्कम वसुलीसाठी लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा तुम्ही स्वतः अथवा तुमचे माहितगार वकीला मार्फत दिनांक २७/०३/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता ॲड. श्री. अमित जी. चोरडिया, लवाद अधिकारी, आर्बिट्रल ट्रिब्यूनल, अहमदनगर
लवाद प्राधिकरण : विस्तारीत इमारत – ३ रा मजला, वैकुंठभाई मेहता प्रशिक्षण सभागृह, नगर अर्बन को ऑप बँक लि, बँक रोड, पानसरे गल्ली, अहमदनगर यांचे समोर हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, गैरहजर राहिल्यास आपणास काही सांगावयाचे नाही,असे समजुन लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम करणेत येईल, याची नोंद घ्यावी. लवाद अधिकारी यांचे सही व शिक्यानिशी दिले असे.

(शिक्का)

श्री. अमित जी चोरडिया
लवाद अधिकारी, अहमदनगर

ARL

## बुलडाणा अर्बन संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर यांच्या उपस्थितीत एक दिवसीय कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १८ मार्च :** सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन सर्वसामान्य घटकांच्या आर्थिक व सामाजिक उत्थानासाठी कार्य करणाऱ्या बुलडाणा अर्बन संस्थेच्या सिल्लोड विभागीय कार्यालय येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर यांची दि.१७ मंगळवार रोजी सिल्लोड विभागातील शाखा व्यवस्थापक यांची एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.यावेळी त्यांनी संस्थेच्या व्यवहार वाढीकरिता गोदाम व सोनेतारण कर्ज तसेच ठेवीवाढ, नवीन शाखांची निर्मिती,सुरक्षित कर्ज वाटप,संस्थेच्या सामाजिक उपक्रम तसेच संस्थेची माहिती देण्यासाठी जनसंपर्क वाढविणे विषयांवर मार्गदर्शनपर सूचना केल्या, विभाग सिल्लोड कामकाजाचे कौतुक केले. तसेच विभागातील शाखांची माहिती घेतली.यावेळी विभाग सिल्लोड चे विभागीय व्यवस्थापक संजय दळवी व शाखा सिल्लोड चे वरिष्ठ शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे यांच्या वतीने अध्यक्ष यांचा स्वागत सत्कार करण्यात आले.सदर कार्यशाळेसाठी विभागीय व्यवस्थापक संजय दळवी,विभागीय लेखा परीक्षक व सर्व शाखा व्यवस्थापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### जाहीर नोटीस

ॲड.एस.जी.नैनाव

सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर येथील मे.दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो.यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज क्रं:- १४६/२०२६
निशाणी क्रमांक :-
चौकशी तारीख १८/०४/२०२६
अर्जदार
१) श्रीमती,अश्र्विनी प्रविण भोकरे, वय ३८, धंदा-घरकाम,
२) श्रीमती. पुष्पाबाई सुधाकर भोकरे, वय-६८, धंदा-घरकाम, दोघे रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर
:- विरुध्द:-
महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी सो. छ. संभाजीनगर

– सामनेवाला

जाहीर नोटीस देण्यात येते की,अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहे, कै.प्रविण सुधाकर भोकरे यांची अर्जदार नं. १ ही पत्नी आहे व अर्जदार नं.२ ही मयताची आई आहे. कै. प्रविण सुधाकर भोकरे हे मौजे गोंदेगाव, ता.सोयगांव, जि.छ. संभाजीनगर येथील कायमचे रहिवासी होते. कै. प्रविण सुधाकर भोकरे हे दि. १२/११/२०२४ रोजी मौजे घाटी रूग्णालय छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. कै. प्रविण सुधाकर भोकरे यांना अर्जदार नं. १ व २ हेच यांचे वारस असून त्यांच्या शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत कै. प्रविण सुधाकर भोकरे यांचे पहिले लग्न मंजुश्री प्रविण भोकरे हिच्याशी झालेले होते. त्यांना लग्नसंबंधातुन कोणतेही मुलबाळ झालेले नव्हते मयताची पहिली पत्नी मंजुश्री ही दि. १६/०५/२०२० रोजी गोंदेगांव ता. सोयगांव येथे मयत झालेली आहे, तिला मयतापासुन मुलबाळ झालेले नव्हते. मयताची पहिली पत्नी मयत झाल्यानंतर मयत कै. प्रविण सुधाकर भोकरे यांनी अर्जदार क. १ हिच्याशी दि. १५/०२/२०२१ रोजी दुसरे लग्न केलेले आहे. सदर लग्नसंबंधातुन मयत कै. प्रविण सुधाकर भोकरे यांच्यापासुन अर्जदार नं. १ हिस मुलबाळ झालेले नव्हते. त्यामुळे वरील दोन्ही अर्जदार मयताची पत्नी व आई असे दोघेच अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. मयत कै. प्रविण सुधाकर भोकरे हे राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागद, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर येथे सह शिक्षक म्हणून नोकरीस होते. ते नोकरीस असतांना मयत झालेले आहे. मयताने त्यांचे हयातीत एल. आय. सी ऑफ इंडीया यांच्याकडे एकूण ७ पॉलीसी काढलेल्या होत्या त्या पुढील प्रमाणे आहे. अ) पॉलीसी नं.९१७७५३९६२ रक्कम रू. ६,००,०००/- ब) पॉलीसी नं. ९१७७५३९५९ रक्कम रू. २,२०,५००/- क) पॉलीसी नं.९१७७५३९६० रक्कम रू. २,२०,५००/- ड) पॉलीसी रक्कम रू. रक्कम रू. २,२०,५००/- इ) पॉलीसी नं. ९१७७५३९६१ नं.९१७७५३९५८ ४,४७,०००/- ई) पॉलीसी नं.९१७७५३९६४-रक्कम रू. २,२२,०००/- उ) पॉलीसी नं.९१७७५३९६३ रक्कम रू. ४,००,०००/- असे एकुण मॅच्युरीटीची व व्याजासहीत रक्कम रू. २८,५०,५००/-(अक्षरी अठ्ठाविस लाख पन्नास हजार पाचशे मात्र) अर्जदारांचे एल. आय. सी. ऑफीस मालेगांव शाखा जि. नाशिक यांचेकडे घेणे आहे. त्यामुळे सदर रक्कमेसाठी व अर्जदार हे मयत कै. प्रविण सुधाकर भोकरे यांचे कायदेशिर बारस आहेत असा वारस दाखला मिळावा यासाठी अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.
सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर येथील मे. दिवाणी न्यायालयाने सदरील अर्जाचे सुनावणीसाठी दिनांक १८/०४/२०२६ रोजीचा दिवस निश्र्चित केलेला आहे.
तरी कै. प्रविण सुधाकर भोकरे यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. यांना वर नमुद वारस म्हणून समाविष्ट करणेसाठी तसेच वारस म्हणून यांचे वारस दाखल्याबाबत कोणाचा हितसंबंध किंवा अजून कोणते वारस असल्यास अगर सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलांमार्फत दिनांक १८/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस म्हणून समाविष्ट करण्यासाठी वारस म्हणूनचे सर्टीफिकेट देण्यात येईल.

आज दिनांक १८/३/२०२६ रोजी माझे सही व मे. न्यायालयाच्या शिक्क्याने दिले असे.

हुकूमावरून

सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर.सिल्लोड



## अग्रलेख...

# धर्मो रक्षति रक्षितः...

'धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।
तस्माद्धर्मो न हन्तव्यो मा नो धर्मो हतोऽवधीत् ॥'

धर्म हा शब्द ऐकला की अनेकांच्या डोळ्यांसमोर केवळ पूजा, प्रार्थना, उपासना किंवा आचार-विचार येतात. परंतु, भारतीय परंपरेत धर्म हा केवळ श्रद्धेचा किंवा कर्मकांडाचा विषय नाही; तो आपल्या समाजरचनेचा कणा आहे, तो कर्तव्याचा मार्ग आहे आणि नैतिकतेचा आधारही. या श्लोकात मांडलेला विचार अत्यंत साधा आहे. तो असा की, जो धर्माचा नाश करतो, धर्म त्याचाच नाश करतो; आणि जो धर्माचे रक्षण करतो, त्याचे रक्षण धर्म करतो. त्यामुळे धर्माचे पालन करणे म्हणजे केवळ स्वतःच्या श्रद्धेचे रक्षण नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या संतुलनाचे रक्षण करणे होय. धर्माचा अर्थ विकृत स्वरूपात मांडण्याचे, त्याचा वापर स्वार्थासाठी करण्याचे आणि समाजात फूट पाडण्यासाठी त्याचा गैरवापर करण्याचे प्रकार वाढताना दिसतात. अशा वेळी सरकारने हस्तक्षेप करणे हा अधिकारांचा नव्हे, तर कर्तव्याचा विषय ठरतो. या पृष्ठभूमीवर विधिमंडळात मांडण्यात आलेल्या महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक-२०२६ कडे सरकार बजावत असलेल्या सामाजिक कर्तव्याचा भाग म्हणून पाहिले पाहिजे. एखादी व्यक्ती धार्मिक आहे किंवा ती एखादा धर्म मानते, याचा लौकिक अर्थ ती व्यक्ती चांगली वागते किंवा पूजापाठ करणारी आहे, असा घेतला जाऊ शकते. खऱ्या अर्थाने धर्म पालनाचा अर्थ होतो चांगले वर्तन आणि चांगल्या गोष्टींचे संवर्धन. धर्म म्हणजे सत्य, कर्तव्य, संयम, न्याय आणि समन्वय यांचे मिश्रण. धर्माच्या नावाखाली फसवणूक, दबाव, भीती किंवा प्रलोभन यांचा वापर केला जातो, तेव्हा तो धर्म नव्हे तर अधर्म बनतो. भारतीय परंपरेत करुणा आणि सहिष्णुता यांना महत्त्व दिले गेले आहे, पण त्याचबरोबर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शिकवणही दिली आहे. म्हणूनच, समाजात जेव्हा धर्माच्या नावाखाली चुकीचे कृत्य घडते, तेव्हा त्याला आळा घालणे ही देखील धर्माचीच सेवा ठरते. नवे विधेयक ही त्या प्रकारची धर्म सेवा आणि समाज सेवा होय.

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात विविध धर्म, संस्कृती आणि परंपरा एकत्र नांदतात. ती आपली ताकद आहे. मात्र, या विविधतेचा गैरफायदा घेऊन कुणी लोकांची दिशाभूल करीत असेल, दबाव टाकत असेल किंवा आमिषे दाखवून त्यांच्या श्रद्धावंत मानसिकतेचा फायदा घेत असेल तर त्यातून त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आघात होतो आणि समाजाच्या संतुलनालाही धक्का बसतो, हे लक्षात घेतले पाहिजे. धर्मांतर हा वैयक्तिक निर्णय नसून परिस्थितीचा परिणाम असतो, हे सांगणाऱ्या अनेक घटना आपल्या भोवताली घडत असतात. भीती, फसवणूक किंवा प्रलोभन यांचा परिणाम म्हणून धर्मांतर केल्याची उदाहरणेही आहेतच. तसे घडू नये यासाठी यासंदर्भात स्पष्ट कायदेशीर चौकट असणे अत्यावश्यक होते. ती उणीव नव्या कायद्याने भरून निघणार आहे. भारतीय संविधानात प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले आहे. पण त्याच वेळी, हे स्वातंत्र्य कुणाच्या फसवणुकीचे साधन बनू नये, याचीही काळजी घेणेही आवश्यक आहे. नवीन विधेयक याच संतुलनावर आधारित आहे. ते कोणाच्याही श्रद्धेवर बंधने घालत नाही; उलट खऱ्या अर्थाने ती स्वतंत्र राहावी यासाठी संरक्षण देणारे हे विधेयक आहे. एखाद्या व्यक्तीने पूर्ण विचारपूर्वक, कोणत्याही दबावाशिवाय आपला धार्मिक मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला असेल तर त्याला कुणीही अडवणार नाही. मात्र, तो निर्णय दबावाखाली घेतला जात असेल, तर त्याला थांबविणे ही सरकारची जबाबदारी ठरते. त्याची तजवीज करणारा हा कायदा आहे.

वरकरणी धर्म बदलल्याने फार मोठे नुकसान किंवा फायदा होतो, असे लोकांना वाटत नाही. प्रत्यक्षात अनेकांना धर्म परिवर्तनाच्या नंतर प्रचंड मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. त्यांचे पालन-पोषण ज्या वातावरणात झालेले असते, त्याहून अगदी वेगळ्या वातावरणात, वेगळ्या समुदायात जुळवून घेणे सोपे नाही. शिवाय, काही वेळा आमिष किंवा जुलूम या घटनांच्या मागे असतो, हेही दिसते. त्यामुळेच अशा निर्णयांसाठी प्रक्रिया निर्धारित करण्यात आली आहे. ती स्वातंत्र्याच्या नियंत्रणासाठी नाही. ती आहे-संबंधित व्यक्तीने धर्म परिवर्तनाचा निर्णय पूर्णपणे स्वेच्छेने घेतलेला आहे किंवा नाही, याची खातरजमा करण्यासाठी. त्यामुळे कुणी कितीही बोंबा ठोकत असले, तरी हा कायदा कुणाची अडवणूक करण्यासाठी नव्हे, तर भाबड्या माणसांची फसवणूक होऊ नये, यासाठी आणला जात आहे, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

या विधेयकातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कुटुंबाशी संबंधित तरतुदी. धर्मांतराच्या घटनांमुळे अनेकदा कुटुंबांमध्ये तणाव निर्माण होतो. विशेषतः अशा घटनांमध्ये फसवणूक किंवा दबाव असतो, तेव्हा त्याचे परिणाम गंभीर होतात. अशा स्थितीत मुलांच्या हक्कांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजाचा पाया असलेल्या कुटुंबव्यवस्थेची स्थिरता टिकविण्यासाठी अशा तरतुदींची गरज होती. या कायद्यामुळे मुलांचे हित, त्यांचे अधिकार आणि त्यांचे भविष्य अधिक सुरक्षित होणार आहे. एखाद्या व्यक्तीच्या धार्मिक विचारात बदल घडवून आणण्याचा संबंध देशाची वीण विस्कटून टाकण्याच्या उद्देशाशी असेल तर त्याला आळा घातलाच पाहिजे. कायद्याचा उद्देश केवळ मार्गदर्शन करणे नसतो. आवश्यक तेथे प्रतिबंध घालणे हेही कायद्याचे काम आहे. त्यासाठीची व्यवस्था या कायद्यात आहे. जे लोक प्रामाणिकपणे वागतात, त्यांना या कायद्याची भीती वाटण्याचे कारण नाही. पण जे लोक धर्माच्या नावाखाली चुकीचे कृत्य करतात, त्यांच्यासाठी 'ही भूमी सहिष्णु असली तरी दुर्बल नाही' असा या विधेयकाचा सांगावा आहे. आजच्या काळात अनेक गोष्टी वैयक्तिक पातळीवर न होता संघटित पद्धतीने घडतात. त्यामुळे अशा गैरप्रकारांमध्ये संस्थांचा सहभाग असेल, तर त्यावरही कारवाई होणे आवश्यक आहे. या कायद्यातील तरतुदी अशा प्रकारच्या रॅकेट्सना रोखण्यासाठी उपयुक्त आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे- हे विधेयक महाराष्ट्र सरकारने अचानक आणलेले नाही. त्यामागे सखोल अभ्यास, विविध राज्यांतील अनुभव आणि कायदेशीर विश्लेषणाचे पाठबळ आहे. हे विधेयक केवळ भावनिक प्रतिक्रियेचा भाग म्हणून आलेले नाही. ते विचारपूर्वक उचललेले पाऊल आहे. समाजात दीर्घकालीन स्थिरता निर्माण करण्यासाठी अशा कायद्यांची गरज असते. त्यामुळे समस्यांवर प्राथमिक उपाय करणे शक्य होते आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारीही होत असते. शासकाने एका धर्माच्या मागे उभे राहू नये, हे आपल्या राज्य व्यवस्थेचे तत्त्व असले, तरी समाजाचे व्यापक हित सांभाळण्यासाठी काही निर्णय घ्यावे लागतात. हा निर्णय त्यातलाच आहे. तो कोणत्याही एका धर्माच्या बाजूने किंवा विरोधात नाही. जे कुणी वाममार्गाने धर्म परिवर्तन घडवून आणत असतील त्यांना या कायद्याने चाप बसेल, हे मात्र नक्की. कोणताही मोठा निर्णय घेतला की त्यावर टीका होतेच. काही जणांना हा कायदा व्यक्तींच्या स्वातंत्र्यावर बंधन घालणारा वाटू शकतो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, हा कायदा कुणाचेही स्वातंत्र्य मर्यादित करणारा नसून, स्वातंत्र्याचे संरक्षण करणारा आहे. स्वातंत्र्य आणि जबाबदारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. आपल्या स्वातंत्र्याचा वापर इतरांच्या हक्कांवर आघात करण्यासाठी केला जात असेल, तर त्यावर नियंत्रण आवश्यक असते. या कायद्याच्या अधिष्ठानी असलेले तत्त्व हेच होय. धर्म हा कोणाच्याही स्वार्थासाठी वापरण्याचा विषय नाही. तो प्रत्येकाच्या अंतःकरणाशी जोडलेला आहे आणि त्याचा आदर राखला पाहिजे. हा नवा कायदा त्या आदराचे संरक्षण करणारा, लोकांना आपल्या श्रद्धेप्रति अधिक सजग बनविणारा आणि समाजात विश्वासाची भावना निर्माण करणारा आहे. धर्म हा समाजाच्या अस्तित्वाचा पाया आहे. तो पाया पोखरण्याचा प्रयत्न कुणी करीत असेल तर त्याला रोखले पाहिजेच. 'धर्मो रक्षति रक्षितः' या सूत्रातील आवाहन हेच आहे आणि त्यामुळे हे विधेयक पूर्णपणे योग्य व समर्थनीय आहे.

## विशेष

# भारताची ऊर्जा भविष्योन्मुख वाटचाल

प्रा. सुखदेव बखळे

भारताने अणुऊर्जा क्षेत्रात धोरणात्मक बदल करीत 'सस्टेनेबल हार्नेसिंग अँड अॅडव्हान्समेंट न्यूक्लिअर टेक्नॉलॉजी फॉर इंडिया' (शांती अॅक्ट २०२५) हा महत्त्वाचा कायदा लागू केला आहे. हा कायदा लागू करताना केंद्र सरकारने 'अॅटॉमेटिक एनर्जी अॅक्ट, १९६२' आणि 'सिव्हिल लायबेलिटी फॉर न्यूक्लिअर डॅमेज अॅक्ट २०१०' हे दोन जुने कायदे रद्द करून त्याऐवजी एकसंध आणि आधुनिक कायदेशीर चौकट तयार केली आहे. त्यामुळे अणुऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक, नियमन आणि विकास यांना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. भारतातील ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत आहे. पुढील दोन-तीन दशकांमध्ये देशातील वीजवापर दुप्पट होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. सौर आणि पवन ऊर्जा यासारख्या नवीकरणीय स्रोतांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असला, तरी त्यांची एक मर्यादा आहे. त्यांची उपलब्धता सतत स्थिर नसते. याउलट अणुऊर्जा हा स्थिर आणि सातत्यपूर्ण वीजपुरवठा करणारा स्रोत आहे. त्यामुळे ऊर्जा मिश्रणात अणुऊर्जेच्या वाटा वाढविणे हे भारताच्या दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाचे मानले जाते. सध्या भारताची अणुऊर्जा क्षमता सुमारे ८.७८ गीगावॉट आहे आणि देशातील एकूण वीज उत्पादनात तिचा वाटा सुमारे तीन टक्के आहे. हा वाटा वाढविण्यासाठी सरकारने महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित केले आहे. २०४७ पर्यंत १०० गीगावॉट अणुऊर्जा क्षमता निर्माण करण्यात येणार आहे. या पृष्ठभूमीवर तयार करण्यात आलेला 'शांती कायदा' हा केवळ कायद्यांचे एकत्रीकरण नसून अणुऊर्जा क्षेत्राच्या संपूर्ण रचनेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.

शांती कायद्याची व्याप्ती तीन प्रमुख स्तरांवर दिसते. त्यात अणुऊर्जा क्षेत्राचे नियंत्रित उदारीकरण, नियामक व्यवस्था मजबूत करणे आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण तयार करणे, यांचा समावेश आहे. नवीन कायद्यामुळे भारतीय खाजगी कंपन्या, संयुक्त उपक्रम आणि इतर मान्य संस्थांना अणुऊर्जा प्रकल्प उभारणे, संचालन करणे आणि बंद करणे यासाठी परवाना घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तथापि, काही अत्यंत संवेदनशील क्षेत्रे अजूनही केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालीच ठेवण्यात आली आहेत. त्यात युरेनियम समृद्धीकरण, अणुइंधन पुनर्प्रक्रिया, उच्चस्तरीय अणुकचरा व्यवस्थापन, जड पाण्याचे उत्पादन यांचा समावेश आहे. यामुळे राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित बाबींवर सरकारी नियंत्रण कायम राहणार आहे. या कायद्यामुळे अणुऊर्जा क्षेत्रातील नियमन अधिक स्पष्ट आणि मजबूत करण्यात आले आहे. या अंतर्गत 'अॅटॉमिक एनर्जी रेग्युलेटरी बोर्ड' या संस्थेला प्रथमच वैधानिक दर्जा देण्यात आला आहे. परिणामी, या संस्थेची स्वायत्तता आणि विश्वासार्हता वाढण्याची अपेक्षा आहे. नवीन कायद्यात परवाने देणे, तपासणी करणे, उल्लंघनांवर कारवाई करणे आणि दंडात्मक कारवाई करणे यासाठी स्पष्ट प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे.

अणुऊर्जा प्रकल्पांबाबत गुंतवणूकदारांना सर्वाधिक चिंता असते, ती अपघाताच्या परिस्थितीमध्ये होणाऱ्या आर्थिक जबाबदारीची. पूर्वीच्या कायद्यानुसार ऑपरेटरची नुकसानभरपाई जबाबदारी १५ अब्ज रुपये इतकी मर्यादित होती; परंतु पुरवठादारांविरुद्ध कारवाईच्या तरतुदींमुळे आंतरराष्ट्रीय कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास कचरू लागल्या. नवीन कायद्याने स्तरानुसार नुकसानभरपाई प्रणाली लागू केली आहे. मोठ्या रिअॅक्टरसाठी ही मर्यादा ३० अब्ज रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे, तर लहान प्रकल्पांसाठी कमी मर्यादा ठेवण्यात आली आहे. याशिवाय स्वतंत्र अणुऊर्जा नुकसानभरपाई निधी तयार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. भारताने अणुऊर्जा विस्तारासाठी दीर्घकालीन योजना आखली आहे. सरकारच्या मते २०३१-३२ पर्यंत अणुऊर्जा क्षमता २२ गीगावॉटपेक्षा अधिक होऊ शकते. यासाठी देशांतर्गत विकसित ७०० मेगावॉट रिअॅक्टर, आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रकल्प आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

याचबरोबर लघु मॉड्युलर रिअॅक्टर (एसएमआर) विकसित करण्यावरही सरकार भर देत आहे. या क्षेत्रात संशोधनाचे नेतृत्व 'भाभा अॅटॉमिक रिसर्च सेंटर'सारख्या संस्थेकडे आहे. आज जगभर ऊर्जा संक्रमणाची प्रक्रिया सुरू आहे. सौर आणि पवन ऊर्जेचा विस्तार वेगाने होत असला, तरी त्या स्रोतांची उपलब्धता हवामानावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत अणुऊर्जा स्थिर, कमी कार्बन उत्सर्जन करणारा आणि मोठ्या प्रमाणावर उपलब्ध ऊर्जा स्रोत म्हणून महत्त्वाची ठरते. भारताच्या ऊर्जा धोरणात अणुऊर्जेला आता नवी भूमिका दिली जात आहे, ती नवीकरणीय ऊर्जेची स्पर्धक नसून पूरक स्रोत म्हणून पाहिली जात आहे. 'शांती कायदा' लागू झाल्यानंतर अणुऊर्जा क्षेत्रात गुंतवणुकीच्या नवीन संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. खाजगी कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठी भारताचे अणुऊर्जा क्षेत्र अधिक आकर्षक बनू शकते. यामुळे नवीन प्रकल्पांची गती वाढू शकते. तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना मिळू शकते. देशांतर्गत उत्पादन आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळू शकते.काही महत्त्वाची आव्हाने अजूनही कायम आहेत. त्यात प्रामुख्याने अणुऊर्जा प्रकल्पांचा प्रचंड खर्च, स्थानिक लोकांचा विरोध, पर्यावरणीय चिंता, नियामक प्रक्रियेत होणारा विलंब यावर प्रभावी उपाययोजना केल्याशिवाय अणुऊर्जा विस्तार अपेक्षित गतीने होणे कठीण ठरू शकते. 'शांती कायदा २०२५' हा भारताच्या अणुऊर्जा धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. ऊर्जा सुरक्षा, हवामान बदल आणि आर्थिक विकास या तीन मोठ्या आव्हानांच्या पृष्ठभूमीवर हा कायदा भविष्यातील ऊर्जा धोरणाची दिशा ठरवू शकतो. खाजगी क्षेत्राचा सहभाग, नियामक संरचनेची बळकटी, गुंतवणूक सुलभता आणि तांत्रिक प्रगती या माध्यमातून अणुऊर्जा क्षेत्राला नवे आयाम मिळण्याची शक्यता आहे; मात्र या धोरणाचे खरे यश अंमलबजावणीवर अवलंबून राहणार आहे. योग्य नियोजन, पारदर्शक प्रशासन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा संगम साधला गेला तर भारताच्या ऊर्जा भवितव्यात अणुऊर्जा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरू शकते.

कायद्यांचे एकत्रीकरणच नव्हे, तर अणुऊर्जा क्षेत्राच्या वाढीस अडथळा ठरणाऱ्या काही संरचनात्मक समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्नही या कायद्यात करण्यात आला आहे. त्यात सरकारी नियंत्रणाखाली असलेले संचालन मॉडेल, गुंतवणूक रोखणारी नुकसानभरपाईची जबाबदारी व्यवस्था, एका बंद, एकमेव ऑपरेटरवर आधारित नियामक रचना हे पूर्वी अडथळे ठरत होते. नवीन कायदा या सर्व बाबींमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. पूर्वी ऑपरेटरला दोषपूर्ण उपकरणांबाबत पुरवठादारांविरुद्ध थेट कारवाई करण्याचा अधिकार होता. यामुळे पुरवठादारांना मोठ्या जोखमीला सामोरे जावे लागत होते आणि अनेक परदेशी कंपन्या भारतात येण्यास कचरू लागल्या.

नवीन कायद्यानुसार फक्त करारात नमूद असल्यास किंवा जाणीवपूर्वक चुकीचे कृत्य सिद्ध झाल्यास पुरवठादारांविरुद्ध कारवाई करता येईल. यामुळे भारताची कायदेशीर चौकट आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत करण्यात आली आहे. कायद्यात नवीन तक्रार निवारण यंत्रणाही तयार करण्यात आली आहे. यामध्ये अणुऊर्जा तक्रार सल्लागार परिषद, नियामक निर्णयांवर अपील करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण, नुकसानभरपाईसाठी विशेष दावा आयुक्त आणि दावा आयोग यांचा समावेश आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात २०० अब्ज रुपये लघु मॉड्युलर रिअॅक्टर (एसएमआर) विकसित करण्यासाठी देण्यात आले आहेत. २०३३ पर्यंत किमान पाच स्वदेशी 'एसएमआर' कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. 'शांती कायदा २०२५' हा भारताच्या अणुऊर्जा धोरणातील महत्त्वाचा वळणबिंदू ठरू शकतो. कायद्यांचे एकत्रीकरण, खाजगी क्षेत्राचा सहभाग, नुकसानभरपाई व्यवस्थेतील सुधारणा आणि नियामक संस्थेची बळकटी या माध्यमातून अणुऊर्जा क्षेत्राला अधिक सक्षम आणि विस्तारक्षम बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ऊर्जा सुरक्षेसोबतच हवामान बदलाच्या पृष्ठभूमीवर स्वच्छ आणि स्थिर ऊर्जेची गरज वाढत असताना हा कायदा भारताच्या ऊर्जा भवितव्यासाठी महत्त्वाची पायाभरणी ठरू शकतो.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# दोष हा कुणाचा?

विकृती हा मानवी स्वभावाचा एक भाग मानला गेला तरी त्या विकृत वृत्तीला जोपासले गेले तर ती अनेकांच्या दृष्टीने कशी घातक ठरू शकते. ही जाणीव सर्वांना असूनही जर अशा वृत्ती जोपासल्या जात असतील तर मात्र समाजभान गमावले गेले आहे, असेच म्हणावे लागेल. जी गोष्ट समाजातील प्रत्येकाला शरमेने मान खाली घालावी लागेल, इतकी किळसवाणी असेल आणि ती शासन-प्रशासनाच्या लेखी अंशतः चूक असेल तर मग मात्र विकृत प्रवृत्तींचे पीक येऊन विध्वंस करणार, हे नक्की.



विकृती हा मानवी स्वभावाचा भाग म्हणून आपण त्याला सोडून दिले तर ती समाजाला पोखरत जाते, हे तेवढेच खरे. एखाद्या व्यक्तीच्या स्वभावात हा 'विकृत' योग असेल तर त्याच्यावर उपाययोजना करण्याची व्यवस्थाही आपल्या समाजात आहे. पण आम्ही तो त्याचा वैयक्तिक विषय म्हणून डोळेझाक करतो आणि बरेचदा तीच विकृती समाजात संवेदनशील विषय बनतात. मान्यच आहे, आम्ही कुणाच्या वैयक्तिक आयुष्यात ढवळाढवळ करून वळण लावू शकत नाही; किमान जेव्हा संधी मिळेल, तेव्हा असलेल्या अधिकारांचा वापर करून अशा घातक वृत्तींना ठेचून नक्कीच काढू शकतो. हा विषय एवढ्यासाठीच आहे. १० दिवसांपूर्वी जो काही प्रकार भंडारा जिल्ह्यात उघड झाला, तो प्रत्येकाला शरमेने मान खाली घालण्यास लावणारा होता. जो आमच्या आयुष्याला दिशा देतो, ज्याच्याकडून आम्हाला संस्कारांची अपेक्षा आहे. आई-वडिलानंतर जो आमचा एकमेव गुरू असतो, अशा शिक्षकाचा प्रताप विकृत्तीलाही लाजवेल असाच होता. ज्यांनी जग पाहिलं नाही, अशा चिमुकल्यांच्या शरीराशी खेळून आपली किळसवाणी भूक भागविणाऱ्या शिक्षकाचे बाहेर आलेले प्रताप शिक्षकी पेशालाही कलंकित करून गेले. हद्द म्हणजे, हे प्रकार पुढे आल्यानंतर ग्रामस्थांनी शिक्षकाला चोप दिला, तर तोच शिक्षक 'झालं का तुमचं मारून' म्हणून निर्विकारपणे बोलून जात असेल तर या धाडसामागे कोण? याचा विचार व्हायलाच हवा! एक नव्हे, पाचदा या महाशयांनी प्रताप केले. मार खाल्ला. तुरुंगवास झाला. पण ते नोकरीत कायम आहेत. हे कसं? याचं कोड काही उलगडलेलं नाही. इतके गंभीर आरोप. दोषी असल्याचा अहवाल सर्वकाही विरोधात असताना प्रत्येक वेळी निलंबनानंतर नोकरीत पुन्हा समाविष्ट केला जाणारा हा शिक्षक इतका प्रभावी कसा असू शकतो? कदाचित पहिल्याच घटनेनंतर या वृत्तीला ठेचले असते तर आज निष्पाप पाच चिमुरड्यांच्या आयुष्याशी खेळण्याची हिंमत त्याची झाली नसती. सर्व काही विरोधात होते. पण तो न्यायालयातून निर्दोष सुटतो. त्यांचे वरिष्ठ अधिकारीही एवढ्या मोठ्या घटनांकडे अंशतः दोषी म्हणून पुन्हा त्याला नोकरीवर घेण्याचे आदेश काढतात आणि इथेच अशा वृत्तींना खतपाणी घातले जाते. १० वर्षांपूर्वी चुकांची जाणीव ठोसपणे करून दिली गेली असती, तर आम्हाला आज विकृत मानसिकतेवर चर्चा करावी लागली नसती. हा यंत्रणेचा दोष की अजून काही? हा अभ्यासाचा विषय असू शकतो, पण ज्यांच्या हातात अधिकार आहेत, त्यांना त्याची जाणीव होऊ नये, याचे नवल वाटते. मुलींच्या आयुष्याशी खेळणे हा जर अंशतः दोष असेल तर पूर्णतः दोष कोणता, हे अशा अधिकाऱ्यांनी स्पष्ट करायला नको का? हा अंशतः दोष हेच अशा वृत्तींची हिंमत वाढण्याचे मूळ कारण आहे. आमची यंत्रणा निद्रावस्थेत आहे. जोपर्यंत ही झापड डोळ्यावरून निघणार नाही, तोपर्यंत अशा विकृतांचे दोष हे अंशतःच असतील, हे नक्की! एका शिक्षकाने केलेले हे कृत्य शिक्षकी पेशाला लाजविणारे आहे. त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून टाकणारे आहे. पण शिक्षकांच्या एकाही संघटनेला अशा शिक्षकाचा निषेध करावा किंवा त्यावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी मागणी करावी वाटले नाही. आम्ही आमच्या पेशाचे म्हणून आणखी किती संवेदना मेल्यागत वागणारा आहोत. एरवी लहानसहान गोष्टींसाठी रस्त्यावर उतरणाऱ्या या संघटना आज मात्र मूग गिळून बसल्या असतील तर विकृतीला त्यांनी दिलेला हा पाठिंबा तर नाही, असा प्रश्न पडतो. शिक्षकांच्या संघटना असोत किंवा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या वागण्याची पद्धत याच गोष्टी अनिल राऊतसारख्या शिक्षकांचे मनोबल वाढवितात आणि त्यांच्यातील विकृतीची जोपासना करतात. जोपासलेले हे विकृत मग कधीतरी समाजभान विसरून बेभान वागतात. या विकृत मानसिकतेला वेळीच ठेचले गेले नाही तर भविष्यात अनेक अनिल राऊत समाजापुढे आव्हान बनून उभे राहतील आणि मग यंत्रणाही हतबल होऊन सर्व तमाशा पाहत असतील. आज अनिल राऊतच्या निमित्ताने विकृत मानसिकतेला संपविण्यासाठी उदाहरण घालून देण्याची चांगली संधी आहे. दोष अंशतः की पूर्णतः याचे मूल्यमापन करीत बसण्यापेक्षा दोष समाजाला घातक हे हेरून कृती करण्याची ही वेळ आहे, असे वाटते!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# ब्रह्मवैवर्त पुराण

प्रा. दिलीप जोशी

'ब्रह्मवैवर्त' या नावातील 'वैवर्त' शब्द महत्त्वाचा आहे. वैवर्त शब्द विवर्तन शब्दसंबंधित आहे. विवर्तन म्हणजे चक्र किंवा चाकाचे फिरणे अर्थात परिवर्तन. सरळ आणि सोप्या भाषेत रूपांतरण, नित्यबदल, कायाकल्प किंवा अस्तित्व बदल होय. ब्रह्मवैवर्त म्हणजे ब्रह्माचे विवर्तन.

'ब्रह्मवैवर्त म्हणजे ब्रह्मणो विवर्तः ।'

या पुराणात ब्रह्म राधाकृष्ण रूपात विवर्तित झाले. ब्रह्म कृष्णरूपाने प्रकट झाले, नव्हे श्रीकृष्ण म्हणजेच ब्रह्म. '

विवर्त ब्रह्मकात्स्नर्यं च कृष्णेन यत्र शौनक ।
ब्रह्मवैवर्तकं तेन प्रवदंति पुराविदः ॥'

कृष्णाचे आद्यविवर्त प्रकृती आहे. कृष्णाची आद्या प्रकृती श्रीराधा आहेत. हे ब्रह्मवैवर्त पुराण होय. हे पुराण चार खंडात विभागले आहे. ब्रह्मखंड, प्रकृती खंड, गणपती खंड आणि श्रीकृष्णजन्म खंड असे ते चार खंड आहेत. यातील पहिल्या ब्रह्मखंडात बीजरूप असलेल्या परब्रह्म परमात्म्याचे म्हणजे श्रीकृष्ण तत्त्व निरुपण आहे. दुसऱ्या प्रकृती खंडात प्रकृती स्वरूप परब्रह्म परमात्म्याची आद्याशक्ती श्रीराधा तत्त्वाचे आणि उपतत्त्व लक्ष्मी, दुर्गा, सरस्वती, सावित्री यांचे निरुपण आहे. तिसऱ्या गणपती खंडात परमात्म स्वरूप भगवान गणपती तत्त्वाचे निरुपण आहे. चौथ्या श्रीकृष्णजन्म खंडात भगवान श्रीकृष्ण लीला तत्त्वाचे निरुपण आहे. थोडक्यात ब्रह्मवैवर्त पुराणात भगवान श्रीकृष्ण आणि त्यांची अभिन्नस्वरूपा श्रीराधारासेश्वरी यांचे ब्रह्मस्वरूप आणि लीला वर्णन आहे.

नैमिषारण्यात शौनकादी ऋषी बसले असताना तिथे पुराणप्रवक्ते सूत लोमहर्षन महोदय आणि त्यांचे पुत्र उग्रश्रवा यांचे आगमन झाले. त्यांचे पाद्यपूजन करून शौनकादी ऋषींनी सूतनंदन उग्रश्रवा ज्यांना सौती असेही म्हणतात; त्यांना अद्भुत, अपूर्व आणि अभिष्ट पुराण सांगण्याची विनंती केली. सर्वांच्या विनंतीला मान देऊन सौती यांनी परब्रह्म परमात्म्याचे परात्पर स्वरूप म्हणजे भगवान श्रीकृष्ण. त्यांचे विवर्तन ज्या पुराणात सांगितले सांगितले ते ब्रह्मवैवर्त पुराण होय.

ब्रह्मवैवर्त पुराण श्रीकृष्णाने ब्रह्मदेवांना, ब्रह्मदेवांनी धर्माला, धर्माने आपला पुत्र नारायणाला, नारायणाने नारदांना, महर्षी नारदांनी व्यासांना, महर्षी व्यासांनी सूतनंदन सौती यांना सांगितले होते. या पुराणात सर्वप्रथम ब्रह्मखंड असून यात गोलोकातील भगवान श्रीकृष्ण यांचे महिमान आहे. श्रीकृष्ण हेच एकमात्र सत्य असून सर्वोच्च ब्रह्म आहे. त्यांच्यापासूनच सृष्टीचा प्रारंभ झाला. गोलोकात भगवान श्रीकृष्णाच्या वामभागातून श्रीराधा यांचे प्राकट्य, श्रीराधा यांच्या रोमातून गोपिकांचे निर्माण झाले. भगवान श्रीकृष्णानेच आदिशक्ती महालक्ष्मी, महासरस्वती प्रकट केल्या. शिवशक्ती विवाहही त्यांचीच इच्छा होय. ब्रह्मदेवाकडून सृष्टी निर्माण ही श्रीकृष्ण परमात्म्याच्याच इच्छेने झाली. वैकुंठ, शिवलोक, गोलोक यांचे शाश्वत स्थान या पुराणात दिले आहे. याच पुराणातील प्रकृती खंडात दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री आणि श्रीराधा या पंचदेवी म्हणजे प्रकृती असून सृष्टी या पंचदेवीवर अवलंबून असल्याचे प्रारंभीच स्पष्ट केले. परिपूर्णतम श्रीकृष्ण आणि चिन्मयी श्रीराधा यांच्या दिव्य तेजातून विराटस्वरूप बालक म्हणजे श्रीमहाविष्णू निर्माण झाल्याची कथा या पुराणात आहे. याज्ञवल्क्य यांनी केलेली भगवती सरस्वती स्तुती, गंगा उत्पत्ती कथा, तुळशी कथा, तुळशी वृक्ष जन्म, शाळिग्राम पाषाण निर्मिती कथा विस्ताराने आली आहे. वेदजननी सावित्री स्तुती, सावित्री उपासनेने राजा अश्वपतींना कन्यारत्न, त्या कन्यारत्नाचे नाव सावित्री, सत्यवान सावित्री कथा या पुराणात आहे. भगवती लक्ष्मीचे समुद्रमंथनातून प्राकट्य, भगवती स्वाहा, स्वधा, दक्षिणा, षष्ठी, मंगलचंडी, मनसादेवी, आद्य गौमाता सुरभी यांचे उपाख्यान या पुराणात आहे. गणपती खंडात गणेश उत्पत्ती कथा, श्रीगणेशावर शनीचा दृष्टिपात, श्रीगणेशाला गजमुख लावण्याची कथा, गणपतींना अग्रपूजेचा मान, कार्तिकेय नंदी संवाद, गणेश यांची एकदंत होण्याची कथा, परशुराम कथा, गणेश स्तुती या पुराणात आहे. श्रीकृष्ण जन्म खंडात श्रीकृष्ण जन्म वृत्तांत, गोकुळात आगमन, बाललीला, रासलीला, मथुरागमन, कंसवध, द्वारकापुरी निर्माण, रुक्मिणी हरण इत्यादी श्रीकृष्ण चरित्र या पुराणात आहे. ब्रह्मवैवर्त पुराणातील तत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. इथे श्रीकृष्ण परमात्मा सर्वोपरी आहे. ते गोलोकधामात राहतात. त्यांच्या सोबत श्रीराधा आणि गोप-गोपिका राहतात. गोलोकधाम शिवलोक, वैकुंठ, भूलोकाच्याही वर आहे. जिथे जन्ममृत्यू जरा व्याधींना स्थान नाही. श्रीकृष्णाच्याच शरीरातून भगवान नारायण विष्णू आणि भगवान शिव प्रकट झाले. श्रीराधा ही श्रीकृष्णाच्या वामांगातून निर्माण झालेले व त्यांच्या हृदयात कायम निवासी असलेले कृष्णतत्त्वच आहे. श्रीराधा आद्याप्रकृती असून तिचे दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री ही रूपे आहेत. तिच्यातूनच गंगा, तुलसी, मनसा, स्वाहा, स्वधा इत्यादी रूपे उत्पन्न झालीत. श्रीराधा श्रीकृष्णाची तर श्रीकृष्ण श्रीराधेची आराधना करतात. म्हणजे ते परस्पर आराधक आणि आराध्य आहेत.



'राधा भजति श्रीकृष्णम् स च तां च परस्परं ।
उभयोः सर्वसाम्यं च सदा संतो वदंति च ॥'

श्रीकृष्ण गोलोकात रासमंडलात असताना त्यांच्या वामभागातून उत्पन्न झाल्यामुळे श्रीराधा आयोनी आहेत. श्रीदामा यांच्या शापवाणीमुळे श्रीराधा यांना वाराहकल्पात गोकुळात श्रीवृषभानू आणि माता कलावती यांच्या पोटी जन्म घ्यावा लागला. असे असले तरी प्रत्यक्षात योगमायेने माता कलावतीच्या गर्भात वायू होता. जन्माच्या वेळी श्रीराधा तेथे स्वेच्छेने अयोनी प्रकट झाल्या. त्यांचे लग्न प्रसंगात त्यांचे पती श्रीरायान यांच्याशी श्रीराधा यांचा विवाह नसून श्रीराधा यांच्या छायारूपाशी विवाह झाला आणि त्या स्वयं अंतर्धान पावल्या. श्रीदामा यांच्या शापाने श्रीराधा यांना भूतलावर प्रकट व्हावे लागले; तद्वतच श्रीराधा यांच्या प्रतिशापाने श्रीदामा भूतलावर शंखचूड नावाच्या राक्षसरूपात जन्माला आले. त्यांचा विवाह तुळशी यांच्याशी झाला. तुळशीचे श्रीहरीकडून पातिव्रत्य भंग, शंखचूड वध, तुळशीचा श्रीहरीला श्राप, विष्णूचे शालिग्राम रूप तुळशीला हरिप्रिया म्हणून वरदान ही कथा या पुराणात दिली आहे. पुराण हा भारताचा इतिहास, भूगोल, परंपरा, संस्कृती सांगणारे वाङ्मय असून आपला वारसा आहे. त्यातही ब्रह्मवैवर्त पुराण अतीव रोचक, मधुर, ज्ञानवर्धक आणि कल्याणकारी आहे. त्याचा अभ्यास नव्या पिढीने केल्यास नवनीत निश्चित मिळेल.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### माणूस माणसापासून दुरावतोय?

माणूस हा निसर्गतःच समाजप्रिय प्राणी आहे, माणूस कोणाकडे जात-येत नसला, तरी तो माणसांच्या वस्तीतच घर बांधतो. आज कामाच्या व्यापात आणि स्पर्धेच्या युगात प्रत्येक माणूस धावत आहे. उसंत घ्यायलाही तो विसरत आहे. त्यामुळे आपण आणि आपलं, ही वृत्ती बळावत चालली आहे. मग विचार येतो की, खरंच माणूस माणसापासून दूर चाललाय काय? या धावपळीच्या युगात कुटुंबातला प्रत्येक जण यंत्रासारखा पळतोय. घरातून बाहेर पडताना आपण कुटुंबीयांना घाईतच 'लव्ह यू', 'मिस यू' बस्स! एवढेच शिल्लक राहिले आहे. विचार करा, आपण आपल्या मुलांना दिवसातून एकदा तरी जवळ घेतो का? त्यांच्या केसातून मायेने हात फिरवतो का? नात्यांमधला औपचारिकपणा वाढला आहे.

तरुणाई नातेवाईकांनाही ओळखत नाही. कोणाशी, कोणते नाते हे त्यांना सांगता येत नाही. जेवढ्यास तेवढे ही वृत्ती वाढत आहे. यामुळे नात्यातील गोडवा, प्रेम लुप्त होतेय. वाढत चाललेला हा औपचारिकपणा कमी व्हायला हवा तरच माणसातले आपलेपण टिकून राहील. माणसांच्या गावात वा शहरातच तो वस्ती करतो. म्हणजे प्रत्यक्ष ओळखीत अथवा येता-जाता कोणाशी गप्पा मारण्यात तो रमत नसला, तरी आजूबाजूच्या माणसांचा कानोसा घेतच तो आपल्या कोषात आपले आयुष्य व्यतीत करीत असतो. नाण्याला जशा दोन बाजू असतात तशाच माणसांबाबत विचार करतानाही सर्व बाबींचा विचार करावा लागेल तरच आपण योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचू की खरंच माणूस माणसापासून दूर जातोय का?

**रूपाली जयदीप हिरवे**/पुणे, ९७६६४०५१२५

### इच्छामरण : दया की हस्तक्षेप?

एखाद्या जिवाला होणाऱ्या वेदना सोसणे किंवा पाहणे अशक्य होते त्यावेळी इच्छ मरण मिळावे असे वाटते आणि असे वाटणे बरोबर आहे. प्रत्येकाचे जीवन हे दोन सिद्धांतावर आधारित असते. एक आहे कर्म-फल सिद्धांत आणि दुसरा पुनर्जन्म सिद्धांत! या सिद्धांतांचा सोपा अर्थ असा आहे की, प्रत्येक कर्माला फळ आहे आणि ते करणाऱ्या व्यक्तीला ते भोगावेच लागते. एका जन्मात ते भोगून झाले नाही तर त्यासाठी पुढचा जन्म मिळत असतो. आपला प्रत्येकाचा सध्याचा जन्म हा मागील अनेक जन्मातील योग्य-अयोग्य कृतींचे फळ उपभोगण्यासाठीच झालेला असतो. असाध्य आजार होणे किंवा अन्य कोणत्याही कारणांनी परिस्थिती असहनीय होणे आणि परिस्थितीत काही सुधारणा होणार नाही, असे चित्र असल्याने जीवन संपवावेसे वाटणे ही एक भावना आहे; विचार आहे. एका अर्थाने ती भगवंताच्या नियोजनात अज्ञानामुळे केलेली ढवळाढवळ आहे.

रस्त्यावर वाहन वाहतुकीच्या नियमांनुसार चालवले नाही तर आपल्याला शिक्षा होते तसेच भगवंताच्या नियमांचे उल्लंघन झाले तर शिक्षा होणारच आहे. स्वतःचे किंवा दुसऱ्याचे जीवन संपवणे हे भगवंताच्या नियमांचे उल्लंघनच आहे. मग यावर उपाय काय तेही हिंदू धर्माने सांगून ठेवले आहे. आपल्या जीवनाचा उद्देश फक्त आपल्या मागील जन्मांतील योग्य अयोग्य कृतींचे फळ म्हणजेच प्रारब्ध भोगणे एवढाच नाही तर चिरकाल टिकणाऱ्या आनंदाची प्राप्ती हा सुद्धा उद्देश आहे. आपले प्रारब्ध कितीही भयंकर असले तरी सच्चिदानंदस्वरूप असलेल्या भगवंतासमवेत मनाने राहून जीवन जगत असताना म्हणजेच आपले प्रारब्ध भोगून संपवताना आनंदी राहता येते. भगवंतासोबत मनाने कसे राहावे तर ते नामस्मरणाने सहज शक्य आहे. हाक मारली तर ती व्यक्ती मागे वळून पाहते तसेच आपण नामस्मरण सुरू केले तर भगवंत आपल्याकडे पाहतो. जीवन संपवावेसे वाटणे इतके ते भयानक असेल तर त्याला आपणच कारणीभूत आहोत, हे स्वीकारावे लागेल. पण ते आपल्या मनाने संपवले तर त्यासाठी भगवंताच्या कायद्यानुसार असलेल्या शिक्षा भोगायची तयारी आपल्याला ठेवावी लागेल. त्यापेक्षा नामस्मरणाची कास धरूया आणि जीवन आनंदात जगूया.

**छाया मिराशी**/पुणे

### पाण्याचे दुर्भिक्ष्य

१५ मार्च २०२६ च्या तरुण भारतात पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि १४ मार्चच्या अंकात विदर्भातील ८२ सिंचन प्रकल्पांपैकी केवळ १४ पूर्ण. उर्वरित ६८ प्रकल्प प्रगतिपथावर व ८ प्रकल्पांचे काम रखडले. उन्हाळा जेमतेम सुरू होत आहे तर काही गावांना टँकरने पाणी पुरवण्याची वेळ आलेली आहे. सद्यस्थितीत सुरू असलेल्या ६८ प्रकल्पांची एकूण अद्ययावत किंमत सुमारे १ लाख ४२ हजार कोटी रुपये इतकी असून मार्च २०२५ अखेर ५७ हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे. सिंचन प्रकल्पांमुळे पिण्यासाठी पाण्याची सोय, पिकांसाठी सिंचनाची सोय व कारखान्यांसाठी पाण्याची सोय होत असते. सिंचन प्रकल्पांमुळे पूर नियंत्रण होत असते. काही सिंचन प्रकल्पामुळे वीज निर्मिती होत असते. अशी सिंचन प्रकल्पांची उपयुक्तता लक्षात घेता विदर्भातील ८२ सिंचन प्रकल्पांपैकी केवळ १४ पूर्ण झाले ही बाब चिंतनीय आहे. उपरोक्त आकडेवारी बघता विदर्भातील सिंचन प्रकल्पांचे पुनर्नियोजन करणे आवश्यक आहे असे वाटते. सिंचन प्रकल्प व पाणी अत्यंत महत्त्वाच्या बाबी असल्यामुळे याचे यथोचित नियोजन होणे जरुरी आहे.

**शशिकांत दलाल** /नागपूर, ९८२२३६५१९०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## जयभीम नगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी रुपचंद कांबळे



**माजलगाव / (प्रतिनिधी)** | जयभीम नगर, माजलगाव येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्यासाठी 2026 सालची उत्सव समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी रुपचंद नाना कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्षपदी बबन शेळके, कोषाध्यक्षपदी चंद्रमणी डोंगरे (सर), सचिवपदी राहुल कांबळे तर देखावा प्रमुख म्हणून विनय पोटभरे यांची निवड करण्यात आली आहे.

याशिवाय सल्लागार मंडळात चंद्रकांत नाना टाकणखार, अविनाश दादा बनसोडे, अशोक मगर, सुभाष बनसोडे, आकाश जोगदंड, दीपक कसबे, जितेंद्र पोटभरे, मधुकर साळवे, किसन भदर्गे, परमेश्वर हजारे, अशोक डोंगरे, अतुल भदर्गे, बिभीषण सोनवणे, नारायण मगर, सचिन साळवे, दयानंद मगर, स्वप्नील पोळ, रविकिरण टाकणखार, दयानंद सावंत, साजन जाधव, संतोष आठवले, अभिजित साळवे, विशाल टाकणखार, सचिन वैद्य, आकाश टाकणखार, शिवदास टाकणखार, भिकाजी कांबळे, सचिन जाधव, शेषेराव उजगरे, मिलिंद कांबळे, बदाम आठवले, उद्धव मस्के, विष्णू साळवे, शिवाजी खरात, तात्याराव वाघमारे, पवन सावंत, बन्सी सिरसाठ यांचा समावेश आहे.

## कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात गुढी उभारून केला उत्सव साजरा



**अंबड- (प्रतिनिधी)** | कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांनी चैत्र शुद्ध प्रतिपदा पासून गुढीपाडव्या सणानिमित्त सुरु होणाऱ्या नवीन वर्षाचे स्वागत भेटकार्ड तसेच प्रत्यक्ष गुढी तयार केली. प्रभू रामचंद्राचा दुष्ट शक्तीवर विजय मिळविला तो हा दिवस. गुढीपाडवा हा हिंदू नववर्षाचा पहिला दिवस (चैत्र शुद्ध प्रतिपदा) असून महाराष्ट्रात आनंदाने साजरा केला जातो. या दिवशी घराबाहेर विजयाचे प्रतीक म्हणून 'गुढी' उभारली जाते, कडुनिंबाचा प्रसाद खाल्ला जातो आणि नवीन कार्याची सुरुवात केली जाते. हा वसंत ऋतूचे आगमन, रब्बी पिकांची कापणी आणि प्रभू रामचंद्रांचा विजयोत्सव म्हणून साजरा होतो. या दिवशी नवीन वर्षाची सुरुवात होते नवे चांगले संकल्प करणे . आद्य सरसंघचालक पूजनीय डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्मदिवस. गुढीपाडवा निमित्त आप्त - नातेवाईक यांना शुभेच्छा पत्र पाठवणे.घरावर विजयाची प्रतीक असलेली गुढी उभारून आनंद साजरा करणे.

## कु.अवनी मोगरकरचे ऑलिम्पियाड परीक्षेत यश

**परळी (प्रतिनिधी)** | परळी शहरातील गणेशपार भागातील ज्ञानबोधिनी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.अवनी अश्विन मोगरकर हीने ऑलिम्पियाड परिक्षेत सुवर्णपदक मिळवत यश संपादन केले आहे. कु.अवनी ही नगरसेविका सौ.जयश्री मोगरकर यांची नात आहे. इयत्ता १ ली ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या ऑलिपियाड स्पर्धात्मक परीक्षा आहेत.या परीक्षा गणित, विज्ञान,इंग्रजी आणि तर्कशक्ती यांसारख्या विषयांमधील विद्यार्थ्यांचे सखोल ज्ञान आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य तपासतात. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण करणे आणि त्यांची बौद्धिक क्षमता वाढवणे,गणित,विज्ञान, इंग्रजी,कॉम्प्युटर आणि सामान्य ज्ञान ही ऑलिम्पियाड परीक्षेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांत आत्मविश्वास वाढतो, विश्लेषणात्मक कौशल्ये सुधारतात आणि भविष्यातील स्पर्धा परीक्षांसाठी पाया तयार होतो.या ऑलिम्पियाड परिक्षेत ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयात इयत्ता पहिलीत शिकत असलेल्या कु.अवनी अश्विन मोगरकर हीने सुवर्णपदक मिळवत यश संपादन केले आहे.याबद्दल तिचे कौतुक होत आहे.



## प्रयागबाई मुळे यांचे निधन



माजलगाव प्रतिनिधी : तालुक्यातील श्रृंगारवाडी येथील रहिवासी असलेल्या प्रयागबाई आबासाहेब मुळे वय 90 वर्षे यांचे दि. 17 मार्च 2026 रोजी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर दि. 18 मार्च 2026 रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परियावर आहे. दि. 20 मार्च रोजी त्यांचा सावडण्याचा कार्यक्रम होणार आहे. बाजार समीतीचे कोषपाल मिनानाथ मुळे यांच्या मातोश्री होत.

# केज मांजरसुंभा रोडवर जळत्या लक्झरी बसचा थरार

## खासगी लक्झरी बस पलटी होऊन घेतला पेट; २८ प्रवासी जखमी

**केज/प्रतिनिधी** | केज-मांजरसुंबा रोडवर सोमवार रोजी मध्यरात्री २:३० वा. च्या सुमारास केज पासून जवळ सांगवी-सारणी वळणावर एक ट्रॅव्हल्स बस पलटी झाली आहे. बस पलटी होताच बसने पेट घेतला. अपघातात २८ प्रवाशी जखमी झाले आहेत.

दि. १६ मार्च, सोमवार रोजी मध्यरात्री २:३० वाजण्याच्या सुमारास जळगावहून लातूरकडे जात असलेली भरधाव वेगातील खाजगी ट्रॅव्हल्स कंपनीची लक्झरी बस ही केज मांजरसुंबा रोडवर असलेल्या सांगवी-सारणीच्या वळणावर चालकाचा ताबा सुटल्याने रस्त्याच्या कडेला पलटी झाली. बस मधील जखमी प्रवासी बाहेर पडत असताना बसने पेट घेतला. मात्र सुदैवाने या आगीत जीवित हानी झाली नाही. अपघाताची माहिती पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना मिळताच त्यांनी रात्र गस्तीवर असलेल्या पोलिस पथकाला माहिती देताच पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इमानदार व चालक सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शंभुदेव दराडे हे तत्काळ अपघातस्थळी हजर झाले. त्यांनी रुग्णवाहिकेशी संपर्क साधला. पोलिस, रुग्णवाहिका चालक सुमित तेलंग, त्याचे इतर सहकारी आणि गावकऱ्यांच्या मदतीने प्रवाशांना अपघातग्रस्त वाहनातून बाहेर काढण्यात आले. अपघातात २८ प्रवाशी जखमी झाले आहेत.



अपघात ग्रस्ताने ट्रॅव्हल्स बसने घेतला पेट बस जुळून खाक :-अपघातात पलटी झालेल्या ट्रॅव्हल्स कंपनीच्या लक्झरी बस मधून जखमी प्रवाशांना बाहेर काढले जात असतानाच घर्षणामुळे निर्माण झालेल्या उष्णतेने बसने पेट घेतला आणि गाडीच्या इंधनाची टाकी फूटल्याने आग भडकून बस पूर्णतः जळून खाक झाली. रात्रीची वेळ असल्यामुळे आग आटोक्यात आणण्याची संधी मिळाली नाही. या आगीमुळे रोडवर मध्यरात्री जळत्या बसचा थरार पहायला मिळाला.

**प्रवाशांचे सामान जळून खाक** | बसने पेट घेतल्याने प्रवाशांचे सामान जळून खाक झाले.

**पोलिस आणि रुग्णहिका चालक यांची तत्परता** | अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि रुग्णवाहिकाचा चालक व सोबतचे कर्मचारी यांनी अपघातस्थळी तत्काळ हजर होत जखमींना बाहेर काढले.

**जखमीवर उपचार सुरू** | अपघातील ३८ जखमी प्रवाशांवर केज येथील उपजिल्हा रुग्णालयात कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकारी व त्यांच्या स्टाफने प्रथमोपचार करून संदर्भीय उपचारासाठी त्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात हलविले आहे.

## केज येथे मंत्री संजय शिरसाट यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार

**केज/प्रतिनिधी** | महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना. श्री. संजय शिरसाट, मराठवाडा सचिव श्री. अशोक पटवर्धन, शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. सचिन मुळूक तसेच श्री. बाळासाहेब सानप हे केज येथे सदिच्छा भेटी साठी रविवार दि. १५ मार्च रोजी आले असता त्यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.



यावेळी शिवसेनेच्या उपनेत्या तथा माजी आमदार सौ. संगीताताई ठोंबरे, प्रा. विजयप्रकाश ठोंबरे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख पृथ्वीराज पाटील, शिवसेना विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे, तालुका सचिव विकास काशीद, महिला आघाडी तालुकाप्रमुख जयाताई राऊत, शहर प्रमुख वैशालीताई सांगळे, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, ज्येष्ठ नेते मालोजी नाना गलांडे पाटील, ज्येष्ठ नेते प्रकाश गुंड, ज्येष्ठ नेते डॉ. संतोष बुडूक, अभिजीत घाटूळ, संदीप नाईकवाड, अशोक जोगदंड, बळीभाऊ चाटे, बलवंत सिंग गोके यांच्या सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी केज तालुक्यातील विविध विकास कामांबाबत ना.श्री. संजय शिरसाट यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच तालुक्यातील प्रलंबित विकास कामांसंदर्भात निवेदन देण्यात आले आणि आजपर्यंत केलेल्या कार्याचा कार्य अहवालही सादर करण्यात आला.

## ठाणे येथून अपहरण करून अल्पवयीन आदिवासी मुलीची लग्नासाठी पाटोद्यात विक्री;6 जणांवर गुन्हा दाखल

**तभा. वृत्तसेवा**

**ठाणे** | बीड तालुक्यातील हिवरा पहाडी येथे अल्पवयीन विवाहित महिलेवर उचलून नेत अत्याचार केल्याची घटना ताजी असतानाच आणखी एक धक्कादायक खळबळ जनक घटना उघडकीस आली आहे.भिवंडीतून एका १५ वर्षीय आदिवासी मुलीचे कथितरित्या अपहरण करून तिला लग्नाचे आमिष दाखवले.तिला पाटोदा तालुक्यातील एका व्यक्तीला विकल्याचा प्रकार समोर आला आहे

याप्रकरणी मुलीचा पती आणि इतर पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, अत्यंत गरिबी आणि पालकांचा आधार नसल्याने या पीडित मुलीचे शोषण करण्यात आले. २६ फेब्रुवारी रोजी एका दलालाने आणि त्याच्या साथीदारांनी तिला लग्नाद्वारे चांगले आयुष्य देण्याचे वचन देऊन तिचे कथितरित्या अपहरण केले, मात्र प्रत्यक्षात त्यांनी तिला बीड जिल्ह्यातील पाटोदा येथील एका वयस्कर व्यक्तीला विकून टाकले.२७ फेब्रुवारी रोजी धमक्या देऊन या अल्पवयीन मुलीला एका बेकायदेशीर लग्नासाठी भाग पाडण्यात आले. २७ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत तिचा पती भाऊसाहेब तांबे याने तिला शेतातील एका खोलीत डांबून ठेवले आणि तिच्यावर अत्याचार केला. तिच्या एका नातेवाईकाने तिला शोधून काढले. तिने तिच्यावर ओढवलेल्या संकटाची कहाणी श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांना सांगितल्यानंतर हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला.

## राज्यसभेच्या सिंहासनावर खा.रजनीताई विराजमान

**केज दि १८(प्रतिनिधी)** | महाराष्ट्राच्या जेष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांना काल राज्यसभेत पिठासिन अधिकारी म्हणून काम करण्याचा बहुमान मिळाला. दिवसभराचे संपुर्ण कामकाज त्यांच्या नियंत्रणात पार पडले. पिठासिन अधिकारी म्हणून त्यांनी प्रभावीपणे काम केले. याच सभागृहात काही वर्षापुर्वी खा. रजनीताईंना निलंबनाच्या कारवाईला सामोरे जावे लागले होते. अर्थात ही कारवाई काही दिवसातच रद्द करण्यात आली होती. मात्र काल रजनीताईंचा राजयोग पहायला मिळाला. राज्यसभेतील सर्वोच्च अशा सिंहासनावर विराजमान होण्याची संधी त्यांना मिळाली. अशा संधीचे सोने करत त्यांनी ही जबाबदारी यशस्वीरीत्या पूर्ण केली.




राज्यसभेतील पिठासीन अधिकारी हे पद अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदारीचे असते. या पदामुळेच सभागृहातील कामकाज सुरळीत, नियमबद्ध आणि निष्पक्ष पद्धतीने चालते. राज्यसभेचे स्थायी भारताचे उपराष्ट्रपती (हे राज्यसभेचे सभापती असतात) त्यांच्या अनुपस्थितीत उपसभापती किंवा इतर नियुक्त सदस्य पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहतात. या पदावरील व्यक्ती सभागृहाचे संचालन चर्चा, प्रश्नोत्तर, विधेयके यांचे नियोजन करत असतात. सदस्यांमध्ये शिस्त राखणे,गोंधळ झाल्यास कारवाई करणे, कार्यपद्धती व नियमांचे योग्य पालन होईल याची खात्री करणे मतदानात बरोबरी झाल्यास निर्णायक मत देणे, निष्पक्षता राखणे, कोणत्याही पक्षाचा पक्षपात न करता काम

## नवोदय प्रवेश परीक्षेत माजलगावची सुहृदा कुलकर्णी जिल्ह्यात अव्वल



**माजलगाव (प्रतिनिधी)** | नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत माजलगाव येथील कु. सुहृदा सारंग कुलकर्णी हिने ९८.७५ टक्के गुण मिळवत बीड जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे सर्वत्र कौतुक होत आहे.

नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा ही गुणवत्ता तपासणारी अत्यंत कठीण व महत्त्वाची परीक्षा मानली जाते. या परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत सुहृदाने आपली बुद्धिमत्ता व मेहनत सिद्ध केली आहे. ती माजलगाव येथील प्रसिद्ध डॉक्टर सारंग कुलकर्णी यांची कन्या आहे. सुहृदाच्या यशामागे तिच्या आई-वडिलांचे तसेच शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. याशिवाय मनीषा जाधव व डॉ. आर्यन जाधव यांचे तिला विशेष मार्गदर्शन मिळाले.

तिच्या या यशाबद्दल डॉ. आर्यन जाधव व प्रा.डॉ. सुदर्शन स्वामी यांच्या हस्ते सुहृदाचा सत्कार करण्यात आला. तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असून, भविष्यातही ती यशाची परंपरा कायम ठेवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सुहृदाच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# बीडच्या मजूरांनी बूर्ज खलिफा व्हाइट हाऊस मध्ये काम केले मृतांना अनूदान दिले कोनाळेच्या कामगिरीने सभागृह गाजले

**बीड** | जिल्ह्यातील बांधकाम कामगार विभागात मृत कामगारांना जिवंत दाखवून त्यांच्या नावे अनुदान दिल्याचा मोठा घोटाळा उघडकीस आला होता. दहा वर्षापुर्वी मरण पावलेल्या व्यक्तीला नगर परिषदेतील अधिकाऱ्यांनी जिंवत दाखवून त्याने चक्क शंभर दिवस काम केल्याचे कागदोपत्री दाखवले.त्यानंतर त्याच व्यक्तीला पुन्हा मृत दाखवून त्याच्या कुटुंबियांना दोन लाख तीस हजार रुपयाचे अनुदान मिळवून दिल्याचा दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी विधानसभेत केला.

बीड जिल्ह्यात अशी शंभर प्रकरण समोर आली आहेत, आणखी एवढीच प्रकरण घडल्याचा अंदाज आहे. काही कामगार हे बुर्ज खलिफा आणि व्हाईट हाऊसमध्ये काम करून आल्याचे देखील नगरपरिषदेच्या रेकॉर्डवर नोंदी आहेत.या घोटाळ्याची व्याप्ती लक्षात घेता सचिव स्तरावरील अधिकाऱ्याची नियुक्ती करून चौकशी करावी तसेच दोषी अधिकाऱ्यांकडून घोटाळा झालेली कोट्यवधीची रक्कम वसुल करावी, अशी मागणीही सुरेश धस यांनी केली. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार सुरेश धस यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून बीडमधील बांधकाम कामगार विभागातील हा घोटाळा चव्हाट्यावर आणला.

2020 ते 2026 दरम्यानच्या अर्जांमध्ये मृत व्यक्तींना जिवंत दाखवून 100 दिवस काम केल्याचे घोषणापत्र दिल्याचे आणि पुन्हा मृत दाखवून वारसांना सुमारे 2.30 लाख रुपयांचे अनुदान दिल्याचे उघड झाले आहे. 2013 मध्ये मृत झालेल्या व्यक्तीला 2023 मध्ये कामगार दाखवण्याचा प्रतापही नगरपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका आणि काही ग्रामपंचायतींमध्येही घडला आहे.

अशा 100 ते 200 संशयास्पद प्रकरणांसह काही नोंदींमध्ये व्हाईट हाऊस व बुर्ज खलिफा येथे काम केल्याचेही दाखवले गेले आहे. हा प्रकार कोट्यवधींचा घोटाळा असून बोगस कागदपत्रे व अधिकाऱ्यांच्या संगनमताची शक्यता लक्षात घेता सचिव स्तरावर स्वतंत्र चौकशी, दोषींवर गुन्हे आणि संपूर्ण रकमेची वसुली केली जावी.बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार खात्यात झालेला घोटाळा हा कोरोना काळ आणि त्या अगोदर मृत झालेल्यांच्या बाबतचा आहे. त्या काळात मृत झालेले लोक परत जिवंत झाले आणि त्यांनी काम केले. त्यांना तसे प्रमाणपत्र दिले गेले. नंतर ते पुन्हा मयत झाले आणि त्यांच्या कुटुंबियांना अडीच लाखांचे अनुदान देण्यात आले. 2013 मध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तीला अंबाजोगाई नगर परिषदेने मृत्यू प्रमाणपत्र दिलं. त्यानंतर त्यांनी याच व्यक्तीला दहा वर्षांनी म्हणजे 2023 मध्ये ते शंभर दिवस एका व्यक्तीकडे कामाला होते, अशी नोंद आहे.

कामगार म्हणून त्यांनी ऑनलाईन पोर्टलमध्येही नोंद केली आहे. कमलाकर मोडेगावकर या मृत झालेल्या व्यक्तीच्या नावे त्यांचे स्वयंघोषणा पत्रही दिले, की मी कामाला होतो. दहा वर्षानी ते वरून खाली कसे आले? परत मोडेगावकर यांना एक मृत्यू प्रमाणपत्र अंबाजोगाई नगर परिषदेनेच दिले. 2023 मध्ये पुन्हा ते वारले. गजानन मोडेगावकर या त्यांच्या मुलाला स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यावर दोन लाखाच्या अनुदानाची रक्कमही पाठवली गेली.नगर पंचायती, नगरपालिका, नगर परिषदांमध्ये असे प्रकार झाले आहेत. काही ग्रामपंचायतीमध्येही असे खोटे प्रमाणपत्र दिले आहेत. माझ्या कानावर आलेल्या प्रकरणात अशी शंभर उदाहरणे आहेत. किमान दोनशे प्रकरण बीड जिल्ह्यात समोर आले आहेत. या घोटाळ्याच्या चौकशीसाठी सचिव स्तराच्या अधिकाऱ्याची समिती नेमून चौकशी करावी. दीड-लाख कामगारांची बीडमध्ये नोंद आहे. हे गंभीर प्रकरण असून दोनशे प्रकरणात 2 लाख 30 हजार प्रत्येकी असा हा मोठा घोटाळा झाला असल्याचे सुरेश धस यांनी सभागृहात मांडले.

यावर संबंधित खात्याचे मंत्री आकाश फुंडकर यांनी ऑफलाईन कामगारांच्या नोंदणी वेळी असे प्रकार घडल्याचे मान्य केले. आता ऑनलाईन नोंदी आणि बायोमेट्रीकमुळे याला आळा बसला आहे. सुरेश धस यांनी तक्रार केलेल्या प्रकरणांची तपासणी केली त्यात अपघाती मृत्यू एकच होता तो खरा होता हे स्पष्ट झाले आहे. इतर प्रकरणांची कागदपत्रे तपासली जात आहेत.

53 प्रकरणात अनियमितता आढळून आलेले नाही. अपघातील मृत्यू झाल्यास पाच लाख, नैसर्गिक मृत्यूसाठी आपण कामगारांना दोन लाख रुपये अनुदान देतो. सुरेश धस यांनी त्यांच्याकडे असलेले पुरावे द्यावेत, एक स्वतंत्र अधिकारी नेमून या प्रकरणाची चौकशी करू, असे उत्तर फुंडकर यांनी सभागृहात दिले.

## 'गुढीपाडव्याच्या दिनी, संकल्प करूया मनी, विज्ञानासह आरोग्य समृद्धीची कास धरुनी, गुळाचा खडा नित्य खाऊनी, आरोग्याचे होऊ धनी, स्पर्धेच्या युगामध्ये राहू टिकूनी, सुख समृद्धी नांदो जीवनी, सन समारंभ साजरे करू वैज्ञानिक दृष्टीनी.....

चैत्र शुद्ध प्रतिपदेला हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे शालिवाहन संवत्सराचा पहिला दिवस गुढीपाडवा म्हणून दरवर्षी साजरा केला जातो .यालाच आपण नूतन वर्ष म्हणून संबोधतो .मराठी मनाची अस्मिता, विजय, समृद्धी, आनंद ,सौख्य ,उत्तुंग यश आणि आरोग्याची परंपरा जपणारा सण म्हणजे गुढीपाडवा.

विघ्नहर्ता गणपतीची आराधना करून गुढी उभारण्यापूर्वी ब्रह्मदेवाची आराधना केली जाते कारण आजच्या दिनी म्हणजेच चैत्र शुद्ध प्रतिपदेला ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली अशी आख्यायिका आहे. त्याचबरोबर याच दिनी भगवान विष्णूंनी मत्स्य रुपी धारण करून शंकासुर राक्षसाचा वध केला म्हणून गुढी उभा राहिल्यानंतर विष्णूची आराधना केली जाते, 14 वर्षाचा वनवास पूर्ण करून श्रीराम अयोध्येला परतले तो दिनही चैत्र शुद्ध प्रतिपदा . .म्हणून श्रीरामाची, कुलदेवतेची आराधना करून ' ॐ ब्रह्म ध्वजाय नमः' अशी प्रार्थना केली जाते .याच दिनी श्री शालिवाहन राजाने मातीचे सैन्य तयार करून त्यामध्ये चैतन्य भरले आणि युद्ध जिंकले वरील सर्वांचा आदर्श, शिकवण म्हणजे आपण देखील आपल्या मनाला प्रेरित , प्रफुल्लित करून चैतन्य भरले पाहिजे, कृतिशील जीवन, अन्यायाविरुद्ध लढा साहस वैज्ञानिक दृष्टिकोन मनी धरून सन समारंभ साजरे केले पाहिजेत.

दारावर आंब्याचे तोरण, अंगणामध्ये सडा रांगोळी, मन आणि घर परिसर सुशोभित प्रसन्न करून नक्षीदार वेळू काठी (बांबू) ला सुगंधित तेल ,कोमट पाण्याने स्नान ,हळदीकुंकवाची पाच बोटे, रेशमी वस्त्र ,धातूचा तांब्या, साखरेची गाठी फुलांचा हार, कडुलिंबाची डहाळी ,नक्षीदार रांगोळी, श्रीफळ ,सुपारी, गुळ आणि कडुलिंबाच्या फुलांचा प्रसाद दाखवून आरती करताना मन कसे प्रसन्न प्रफुल्लित होते ना.



संस्कृती, परंपरा ,अध्यात्म ,विज्ञान आणि सनसमारंभ यांची सांगड घालून बारकाईने विचार केला तर त्यामागे एक प्रकारे आरोग्य समृद्धी, समाजातील एकी, प्रेमभावना दृढ करण्याचा प्रयत्न दिसून येतो.

वेळू काठी -सामर्थ्याचे प्रतीक हळदीकुंकू -सौभाग्याचे प्रतीक जरीची साडी- वैभवाचे प्रतीक साखरगाठी -माधुरीचे प्रतीक पुष्पहार -मांगल्याचे प्रतीक कडुलिंब -आरोग्याचे प्रतीक तर कलश -यशाचे प्रतीक मानले जाते.

विज्ञानाची कास धरून विचार केला तर हा सण चैत्र महिन्याच्या सुरुवातीलाच असतो. उन्हाची लाहीलाही होऊन आरोग्य संपदा विस्कळीत होण्याची शक्यता असते अशा वातावरणामध्ये साखरगाठी खाल्ल्याने



उष्णतेचा दाह , पोटाचे विकार कमी होतात.

तीन हजार वर्षापासून चालत आलेली आयुर्वेदिक परंपरा व्यापक आणि उत्तुंग परंपरा आहे. आयुर्वेदातील उपचार पद्धतीमध्ये वनस्पतीजन्य औषधी, आहारविषयक नियम, निद्रा ,व्यायामाचे विविध प्रकार आणि त्याद्वारे शरीरातील नैसर्गिक प्रतिकार शक्ती कशी वाढेल यावर भर दिला जातो. त्यापैकीच एक साखरेला आरोग्यदायी पर्याय म्हणजेच गुळ .....

उसाच्या रसापासून /ताडीपासून किंवा खजुराच्या रसापासून बनवलेल्या एक शुद्ध ,उपयुक्त, नैसर्गिक, गडद तपकिरी रंगाचा गोड पदार्थ , जो साखरेला आरोग्यदायी पर्याय मानला जातो तो म्हणजे गुळ .भारत हा कृषीप्रधान देश आहे . जिथे उसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते .जगातील सुमारे 70 % गूळ उत्पादन हे आपल्या भारतामधून होते. अतिशय पौष्टिक , गुणकारी, आरोग्यास हितकारक ,ज्यामध्ये शरीराला आवश्यक असणारे खनिजे आणि मूलद्रव्य मॅग्नेशियम ,कॅल्शियम लोह त्याचबरोबर एंटीऑक्सीडेंट इत्यादी गुण आहेत. लोह- (आयर्न )शरीरातील रक्ताची कमतरता ज्याला ॲनिमिया असे म्हणतात ती दूर करण्यासाठी, लोह महत्वपूर्ण भूमिका बजावते. गुळ आणि शेंगदाणे लाडू जसे हितकारक आहे तसेच रात्री ग्लासभर पाण्यामध्ये गुळाचा खडा टाकून सकाळी पाणी प्यायल्याने सुद्धा शरीराला योग्य प्रमाणात लोह मिळते, पचनक्रिया सुधारते ,शरीरातील मंदावलेली पचनक्रिया सुधारते, एंजाइम्स उत्तेजित करण्याचे काम गुळामुळे सहज शक्य होते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता दूर होण्यास मदत होते यकृताचे निर्वीशिकरण -शरीरातील विविध जैविक क्रियेमधून यकृतामध्ये अनावश्यक घटक, विषारी द्रव्य साचले जातात .या यकृतातील विषारी द्रव्य बाहेर टाकण्यासाठी गुळाची मदत होते. त्याचबरोबर रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी गुळाचा वापर केला जातो. मॅग्नेशियम कॅल्शियम इत्यादी आवश्यक खनिजे असल्यामुळे मज्जातंतू, हाडे ,स्नायू, हृदयाच्या आरोग्यासाठी, चयापचय क्रियेसाठी फायदेशीर आहे. अँटिऑक्सिडंट म्हणजेच ऑक्सिडीकरणरोधी शरीरातील पेशींना फ्री रॅडिकल्स (मुक्तकन) मुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचवणारे ,नैसर्गिक संरक्षण देणारे घटक त्याचबरोबर कर्करोग व हृदयविकाराचा धोका टाळणे,विषारी तत्त्व नष्ट होणे, अकाली वृद्धत्व टाळणे, अशक्तपणा, थकवा दूर होण्यास मदत होते ,ऊर्जा दीर्घकाळ टिकून राहते. उन्हाळ्यामध्ये उन्हातून आल्यानंतर गुळाचा खडा खाऊन पाणी पिल्याने शरीरातील उष्णता शमते. असे विविध औषधी गुणधर्म असलेला गूळ सेवन करणे आरोग्यास लाभदायक आहे. एक चमचा गुळामध्ये अंदाजे 15 ते 20 कॅलरीज असतात. दररोज 10 ते 15 ग्रॅम म्हणजेच छोटा गुळाचा तुकडा सेवन केल्याने त्याचे वरील प्रमाणे फायदे दिसून येतात परंतु प्रमाणापेक्षा जास्त सेवन केल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण सुद्धा वाढू शकते आणि प्रकृतीने उष्ण असल्याने उष्णता देखील वाढू शकते. त्यामुळे गुळाचा प्रमाणात परंतु नित्य वापर होणे गरजेचे आहे.

धन्यवाद

**| अश्विनी वासुदेवराव टेकाळे (जोशी). MSc.BEd.( Botany) चंपावती मा. विद्यालय बीड.|**

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अस्वच्छतेचे प्रतिबिंब, स्वच्छतेची जाणीव

## देगलूर नगर परिषदेचा आरसा प्रयोग

**मिलिंद वाघमारे**
**देगलूर, दि. १८ मार्च-**

सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, कचरा टाकणे यांसारख्या सवयींवर आळा घालण्यासाठी देगलूर नगर परिषदेने एक अभिनव आणि प्रभावी उपक्रम राबविला आहे. देगलूर नगरपरिषदेमधील भिंतींच्या कोपऱ्यांवर आरसे बसविण्यात आले असून, अस्वच्छता करणाऱ्यांना आता स्वतःचेच प्रतिबिंब पाहावे लागत आहे. त्यामुळे अस्वच्छता करणाऱ्यांना स्वच्छतेची जाणीव होत आहे.नगरपरिषदेच्या अभिनव उपक्रमचे सर्वत्र कौतुक होत आहे.

देगलूर नगर परिषदेच्या दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जिन्याचा दोन्ही कोपऱ्यावर आरसे बसविण्यात आले. यामुळे याठिकाणी कोणीही थुंकत नाही. 'आरसा प्रयोगा'मागील उद्देश केवळ नगरपरिषदेमधील स्वच्छ ठेवणे इतकाच मर्यादित नसून, संपुर्ण शहरात व शहरातील विविध कार्यालयात स्वच्छता राहावी हा आहे. स्वच्छतेतून समृद्धीकडे मार्गक्रमण करणे, हा व्यापक दृष्टीकोन आहे.

शहरासह नांदेड जिल्ह्यातील विविध कार्यालयाची इमारतीचे थाटात उद्घाटन करण्यात आले. परंतु काही महिन्यांनंतर त्या शासकीय इमारती व कार्यालयाच्या भिंती अक्षरशः लालबुंद होतात. गुटखा, पान, मावा यांसारख्या पदार्थांचे सेवन करुन भिंती रंगविल्या जातात. जे अत्यंत लाजिरवाणे आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहाची अवस्था अत्यंत बिकट पहावयास मिळते्. अशा परिस्थितीत देगलूर नगर परिषदेने राबविलेले 'आरसा प्रयोग' कौतुकाचा विषय ठरला आहे. हा प्रयोग विविध शासकीय इमारती व कार्यालये आणि स्वच्छतागृसाठी केल्यास अस्वच्छता करणाऱ्यांस लाज वाटेल आणि ती व्यक्ती शक्यतो अस्वच्छता करणार नाही. या अभिनव प्रयोगातून अस्वच्छतेचे प्रतिबिंब दिसून येईल ज्यामुळे स्वच्छतेची जाणीव होईल.

भिंतीवर थुंकताना किंवा कचरा टाकताना अचानक स्वतःचा चेहरा दिसल्याने व्यक्तीला आपल्या कृतीची जाणीव होते आणि लाज वाटते. या मानसिकतेतूनच वर्तनात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न



या उपक्रमातून केला जात आहे. शहरातील स्वच्छता राखणे हे थेट व्यक्तीच्या आरोग्याशी संबंधित आहे. स्वच्छ परिसरामुळे रोगराई कमी होते, आरोग्य सुधारते आणि वातावरण प्रसन्न राहते.

नगर परिषदेच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता वाढत असून, अनेकांनी या कल्पक प्रयोगाचे स्वागत केले आहे. लाज हीच सर्वात मोठी शिक्षा या संकल्पनेवर आधारित हा प्रयोग सामाजिक बदल घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

नगर परिषद प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, शहर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. आरशात दिसणारे प्रतिबिंब केवळ चेहरा दाखवत नाही, तर आपल्या कृतींचा होणारा परिणामही दाखवते हे लक्षात घेऊन सर्वांनी स्वच्छतेचा संकल्प करावा. स्वच्छ देगलूर, समृद्ध देगलूर या ध्येयाकडे वाटचाल करताना हा आरसा प्रयोग एक प्रेरणादायी आणि दिशादर्शक पाऊल ठरत आहे. येणाऱ्या काळात 'आरसा प्रयोग' विविध ठिकाणी पहावयास मिळण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे्

# मुदखेड पोलिस व महसुल प्रशासनाची अवैध रेती उत्खनन करणाऱ्यावर कारवाई

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १८ मार्च-**

नांदेड पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत सर्व पोलीस स्टेशन प्रभारी यांना अवैध रेतीची चोरटी वाहतूक व विक्री करणारे इसमांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.



त्या अनुषंगाने दिनांक १७ मार्च रोजी पेट्रोलींग दरम्यान गोपनीय माहीती मिळाली की, काही इसम हे इंजीन चे सहाय्याने मुगट परिसरातील गोदावरी नदीतुन अवैध रेती उपसा करीत आहेत सदर मिळालेल्या माहीती वरुन मुदखेड पोलिसांनी व महसुल पथकाने छापा टाकून कारवाई केली. गोदावरी नदीपात्रातुन अवैध रेतीचा उपसा करीत असतांना पोलीस पथकास पाहुण अवैध रेती उत्खनन करणारे आरोपी पळुन गेले. सदर घटनास्थळावर मिळुन आलेले रेती उपसा साहीत्य पाच लोखंडी हॉपर ज्यास इंजीन बोट व त्यावर वाळू उपसा साहीत्य असलेली प्रत्येकी २५,००,०००/- रु एकुण १,००,२५,०००/- रु २) एक इंजीन बोट ज्यावर वाळू उपसा साहीत्य असलेली किंमत ५,००,०००/-रु ३) अवैध रेतीसाठा ३५ ब्रास किंमती १,४०,०००/-रु असा एकुन १,३१,४०,०००/- रु चे मुद्देमालाचा महसुलचे अधिकारी यांनी पंचनामा करुन रेती जप्त केली व इतर मुद्देमाल अवजड असल्याने जागीच जिलेटीन चे सहाय्याने नष्ट करण्यात आला आहे. सात आरोपी विरुध्द पोलिस ठाणे मुदखेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधीक तपास सुरु आहे.

मुदखेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक धीरज चव्हाण, पोउपनि. बी.आर.कांबळे, पोहेकॉ बलविरसिंह ठाकूर, पोकॉ चक्रधर, पाशी/ वानोळे, होमगार्ड,व महसूल पथक यांनी उत्कृष्ट कामगीरी केल्यामुळे सर्वांचे अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी अभिनंदन करुन कौतुक केले आहे.

# ग्रामविकस प्रकोष्ठ अध्यक्षपदी निवडीबद्दल मनोहर पाटील शिंदे यांचा सत्कार



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १८ मार्च-**

भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने माजी जि.प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांची पंचायत राज व ग्रामविकास (प्रकोष्ठ) अध्यक्ष पदावर नियुक्ती झाल्याबद्दल नगरसेवक प्रतिनिधी राजु काळे यांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने दिनांक १४ मार्च २०२६ रोजी देण्यात आलेल्या या नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे की, मनोहर शिंदे यांनी पक्षाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतल्याने त्यांची या पदावर निवड करण्यात आली आहे.सदरील निवडी बद्दल माजी नगरसेवक तथा नगरसेवक प्रतिनिधी राजु काळे यांनी आपल्या कौठा येथील संपर्क कार्यालय येथे मनोहर पाटील शिंदे यांचा यथोचित सन्मान सत्कार करण्यात आला.यावेळी बालाजी काळे,विकास यादव,बालाजी कोठारे, निलेश भालके, दिलीप गजभारे,माणीक शिंदे शंकर शिंदे,अमोल खंडागळे यांच्या सह कार्यालयातील आनेक जन उपस्थित होते.

# नगराध्यक्षांच्या मागणीला यश; रेल्वे भुयारी पुलाच्या 'हॉटमिक्स' डांबरीकरण होणार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १८ मार्च-**

शहरातील रेल्वे लेव्हल क्रॉसिंग क्रमांक १२ (किनवट शहर ते नागझरी रोड) येथील भुयारी पुलाखालील रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिक त्रस्त होते. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात धूळ उडत असल्याच्या तक्रारी जनतेकडून सातत्याने केल्या जात होत्या. या गंभीर समस्येची दखल घेत किनवटच्या नगराध्यक्षा सौ. सुजाताताई एड्डंडलवार यांनी रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तातडीने हे काम पूर्ण करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले असून, १८ मार्चपासून या कामाला सुरुवात होत आहे.



वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम रेल्वे प्रशासनाच्या अत्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पूर्ण केले जाणार आहे. यात प्रामुख्याने अपूर्व वशिष्ठ गोपाल प्रसाद सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली हे 'हॉटमिक्स' डांबरीकरणाचे काम नियोजित वेळेत पूर्ण केले जाईल.

वाहतुकीत तात्पुरता बदल (१८ ते २५ मार्च) रस्ता दुरुस्तीच्या कामामुळे या मार्गावरील वाहतूक १८ मार्च २०२६ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत पूर्णपणे बंद राहणार आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या आदिलाबाद येथील वरिष्ठ खंड अभियंता कार्यालयाने यासंदर्भात अधिकृत पत्र निर्गमित केले आहे. बंद मार्ग: रेल्वे लेव्हल क्रॉसिंग नं. १२ (कि.मी. ११७/२-३) येथील अंडरब्रिज रस्ता. पर्यायी मार्ग: नागरिकांनी आणि वाहनधारकांनी या काळात सुभाष नगर येथील अंडरब्रिज (ठणइ छे. १४०) या मार्गाचा वापर करावा.

### सुरक्षा आणि नियोजन

'मेसर्स मिलेनियम कन्स्ट्रक्शन, हैदराबाद' या एजन्सीमार्फत हे काम केले जाणार असून, कामाच्या ठिकाणी योग्य डायव्हर्शन बोर्ड आणि सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात येणार आहे. रस्ता कामामुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# नागपूर - नांदेड महामार्गावरती दोन उड्डानपुल उभारण्याची खा. आष्टीकरांची मागणी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १८ मार्च-**

नागपूर - नांदेड या राष्ट्रीय महामार्गावरती होणाऱ्या भीषण दुर्घटनाच्या पार्श्वभूमीवर हदगाव तालुक्यातील दोन ठिकाण ( मानवाडी फाटा व मनाठा) हे मृत्यूचे हॉटस्पॉट बनले असून त्या ठिकाणी उड्डानपुलाची नितांत गरज असून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदनाद्वारे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी मागणी केली आहे.

नागपूर - नांदेड हे राष्ट्रीय महामार्ग जवळपास पूर्ण झाले असून काही ठिकाणचा अपवाद सोडला तर जसे की, हदगाव तालुक्यातील मानवाडी फाटा या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते या ठिकाणी उडान पूल असणे अत्यंत गरजेचे असून उडानपुला अभावी येथे अनेक लोकांनी आपला जीव गमावला आहे त्याचप्रमाणे मनाठा( शिबदरा) याठिकाणी नवीन उडानपुलाची अत्यंत आवश्यकता आहे. हदगाव शहरातील जुना रोड आणि भानेगाव पांदण या रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्याचा दुतर्फा नियोजित वळण रस्ता निर्माण करण्याची गरज असल्याचे देखील खा. अष्टीकर यांनी निवेदनाद्वारे नितीन गडकरी यांचे लक्ष वेधले. या राष्ट्रीय महामार्गाची आखणी, प्रशासकीय मान्यता व निधी देण्याची जबाबदारी ही केंद्रीय स्तरावर होत असल्यामुळे हदगाव तालुक्यातील या दोन ठिकाणी उडानपूल व वळण रस्ता यास मंजुरी देऊन भविष्यात होणाऱ्या अप्रिय घटना टाळण्यात यावे यासाठी खासदार अष्टीकर यांनी पुढाकार घेत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदनाद्वारे दोन उडानपूल व बाह्य वळण रस्त्याची मागणी केली आहे.

# ग्रंथोत्सवात दहा लाख रुपयांची ग्रंथविक्री

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ मार्च-**

नांदेड ग्रंथोत्सव २०२५ हा १४ व १५ मार्च रोजी उत्साहात संपन्न झाला. वाचकांना नियोजीत कार्यक्रमाच्या साहित्यिक मेजवानी सोबतच, आयोजकांनी मोठ्याप्रमाणात पुस्तकांचे स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले होते. वाचकांना व ग्रंथालय चालकांना पाहिजे असलेली पुस्तके मिळावीत या हेतुने, छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय प्रकाशनाचे स्टॉल, शांती पब्लीकेशन पुणे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथील ग्रंथ प्रदर्शन स्टॉल, संकेत प्रकाशन, निर्मल प्रकाशन नांदेड, संदेश बुक डेपो परभणी प्रगती बुक डेपो हिंगोली, मांडणी कर बुक डेपो नांदेड मराठवाडा बुक सेलर नांदेड ओमकार ओमकार प्रकाशन नांदेड ओमकार प्रकाशन नांदेड हिंगोली व इतर पुस्तकाचे स्टॉल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात आले होते.

या ग्रंथप्रदर्शन व विक्री स्टॉलचे उद्घाटन जेष्ठ साहित्यिक सुरेश सावंत यांनी केले. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, डॉ. मा. मा. जाधव, प्रा.संजय जगताप, साहित्यिक डॉ. विलास वैद्य, साहित्यिक नारायण शिंदे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी आदी मान्यवरांनी हजेरी लावली.

प्रकाशकांनी मोठ्या प्रमाणावर वाचकांना दर्जेदार ग्रंथ उपलब्ध करून दीले होते. त्याला वाचक ग्रंथालय चालकांनी मोठ्या प्रमाणात ग्रंथखरेदी करूण चांगला प्रतिसाद दिला आहे. दोन दिवसात जवळपास दहा लाख रुपयांचे ग्रंथ विक्री झाल्याचे समजते.

# न्याहाळी येथे पोचम्मा देवी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १८ मार्च-**

मुदखेड शहरातील न्याहाळी येथे नूतन बांधण्यात आलेल्या पोचम्मा देवी मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि भव्य महाप्रसाद कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. दि. १५ आणि १६ मार्च रोजी आयोजित या सोहळ्याला भाविकांनी मोठी गर्दी केली होती.



मूर्ती प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाची सुरुवात दि.१५ मार्च रोजी सायंकाळी ५:०० वाजता देवीच्या 'आळंका' विधीने झाली. त्यानंतर रात्री ८:०० वाजेपासून पहाटे ५:०० वाजेपर्यंत देविदास आनंदा सूर्यतळ पोतराज यांचा देवीचा विशेष पारंपरिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला परिसरातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

दि.१६ मार्च रोजी सकाळी ८:०० ते ११:०० या वेळेत मुदखेड येथील श्री मारोती महाराज कालेजी देवी यांच्या पावन उपस्थितीत 'होम-हवन' विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पडला. सकाळी ११:०० वाजता देवीची आरती झाल्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शेकडो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.या संपूर्ण सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणून १६ मार्च रोजी रात्री ८:०० ते ११:०० या वेळेत सुप्रसिद्ध भागवताचार्य ह.भ.प. सुनील महाराज आष्टीकर यांचे कीर्तन पार पडले. त्यांच्या रसाळ वाणीतून झालेल्या कीर्तनाने उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले.

या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन दगडू कोंडिबा आऊलवार, संजय दगडू आऊलवार, विजय दगडू आऊलवार, मारोती कोंडिबा आऊलवार, माधव मारोती आऊलवार, शिवाजी मारोती आऊलवार व समस्त न्याहाळी ग्रामस्थ मंडळानी केले होते.

# गुढी पाडव्यानिमित्त मुखेड शहरात शोभायात्रा

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. १८ मार्च-**

जगद्गुरू रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी नांदेड द.सेवा समितीच्या वतीने दि.१९ रोज बूधवारी सकाळी गूढीपाडवा तथा हिंदू नववर्षाच्या पर्वावर मूखेड शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी जगद्गुरु रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी नानिजधाम यांच्या सेवा समितीच्या वतीने संपूर्ण राज्यात गूढीपाडवा तथा हिंदू नववर्षाच्या पर्वावर शोभायात्रा काढण्यात येत असतात त्यात वेगवेगळे देखावे, लेझीम, ढोल ताशे,पारंपरिक वेशभूषा, भजन मंडळाचा समावेश असतो.हिंदू धर्म संस्कृती चे जतन करण्यासाठी व पूढील पिढीला जाणीव करून देण्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरते त्यानंतर आज मूखेड शहरात सकाळी ७वा आर्य वैश्य मंगलकार्यालया पासून शोभायात्रेस प्रारंभ होत असुन मूख्य मार्गाने ईच्छा पूर्ती हनुमान मंदिर व्यंकटेश नगर येथे आरती व महाप्रसादाने सांगता होणार आहे.

# रस्त्याच्या दुरावस्थेविरोधात मारोती सुंकलवाड यांचे प्राणांतिक उपोषण

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १८ मार्च-**

राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१-अ (छक-१६१) वरील भोकर ते धनोडा दरम्यान गोकुंदा हद्दीत येणारा सेंट मेरीज स्कूल ते बाळासाहेब ठाकरे चौक आणि तेथून पुढे पेट्रोल पंपा पर्यंतचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या रस्त्याच्या तात्काळ दुरुस्ती व बांधकामाच्या मागणीसाठी गोकुंदा येथील जेष्ठ शिवसैनिक मारोती सुंकलवाड यांनी दि. १८ मार्च २०२६ पासून प्राणांतिक उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.



सदर रस्ता मागील सुमारे सहा वर्षांपासून रखडलेला असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून धुळीचे प्रमाण वाढले आहे. परिणामी नागरिक, वाहनचालक व प्रवासी यांचे हाल होत आहेत. विशेषतः शालेय विद्यार्थी, रुग्णवाहिका व दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांची संख्या वाढल्याचीही तक्रार स्थानिकांकडून केली जात आहे.

यासंदर्भात नागरिकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासन व विभागांकडे अर्ज, निवेदने दिली असून पत्रकारांनीही वारंवार वृत्तपत्रांतून प्रश्न उपस्थित केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने प्रशासनाविषयी नाराजी व्यक्त होत आहे.


या पार्श्वभूमीवर जनहिताच्या दृष्टीने व नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी मारोती सुंकलवाड हे दि. १८ मार्च रोजी सकाळी ७ वाजल्यापासून गोकुंदा येथील ठाकरे चौकात प्राणांतिक उपोषणास बसणार आहेत. या आंदोलनाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ रस्त्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

दरम्यान, या संदर्भातील निवेदन सहाय्यक जिल्हाधिकारी, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता तसेच किनवट पोलीस स्टेशन यांना देण्यात आले आहे. आता प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आदमपूरात सर्वधर्मीय शिवनाम,शिवकथा सप्ताहास आजपासून प्रारंभ

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १८ मार्च-**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे १८ वा सर्वधर्मीय अखंड शिवनाम व शिवमहापुरान कथा गुरुवार दि.१९मार्च रोजी थोर गुरूवर्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभ होत आहे.शिवकथाकार म्हणून श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य प.पू.श्रीश्री हरिहरानंद भारती स्वामीजी यांच्या रसाळ वाणीतून या संगीतमय शिवकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची श्रवणीय अनुभूती दैनंदिन भक्तांना मिळणार आहे.



अनुक्रमे गुरूवार दि.१९ मार्च रोजी शि.भ.प.कु. सावित्रीताई मळभागे जंगमवाडीकर,शि.भ.प.निळकंठ विभूते गुरूजी लातूरकर,शि.भ.प.संगिताताई हाळे टाकळीकर,शि.भ.प.कैलास महाराज डोंगरगावकर, शि.भ.प.मन्मथअप्पा डांगे गुरूजी उस्माननगरकर, श्री.ष.भ.प.१०८ शिवचैतन्य शिवाचार्य महाराज हदगांवकर,श्री.ष.भ.प.१०८ दिगांबर शिवाचार्य महाराज वसमतकर शेवटी गुरूवार दि.२६ मार्च रोजी श्री.ष.भ.प. १०८ महादेव शिवाचार्य महाराज वाईकर याचे महाप्रसादावरील किर्तन संपन्न होईल.

गुरूवार दि.१९ मार्च पासून अनुक्रमे गुढीपाडवा त्यानंतर कै.गंगाधर रामचंद्र डुब्बेवार यांच्या स्मरणार्थ, दिवंगत पिरसाब मदार यांच्या स्मरणार्थ माजी बँकर फक्रूशा पिरसाब मदार,माधव इरन्ना बिद्राळे,सहशिक्षक शिवराज हाणमंतराव पाटील,रमेश काळबा डोंपे यांच्या स्मरणार्थ, माजी सरपंच अरविंद बाळासाहेब पेंटे अखेरीस महाप्रसाद दिलीप महाजन देसाई या सर्व शिव भक्तांच्या वतीने दररोज गावकरी भक्तांना प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम अनुक्रमे पहाटे शिवपाठ, सकाळी रूद्राभिषेक, परमरहस्य पारायण,आशिर्वचन, भोजन विश्रांती,दुपारी शिवमहापुरान कथा, सायंकाळी गाथा भजन शिवपाठ,महाप्रसाद आस्वाद,विश्रांती, रात्री शिवकिर्तन, शिवजागर २ वाजेपर्यंत नित्यक्रम नियमित सुरू राहील. कलावंत गायक सिंथ व गायक अभिजित पावडे,तबला गजानन चौधरी,अमरावती,पॅड संतोष सुंबे, अहिल्यानगर,झाँकी प्रदिप काका काळे,छत्रपती संभाजीनगर,अशोक हालबुर्गे,कपिल हांद्रे,बँन्जोवादक मराठी चित्रपट संगीतकार प्रा.संदीप भुरे,शि.भ.प.अशोक अप्पा गुडफळे,संगीत विशारद बाबू स्वामी यांचा सहभाग असणार आहे.

सदरील सोहळ्यात विविध भागातील गायक, गायिका, भजनी मंडळ,विणेकरी, वादक,व्यासपीठ प्रमुख,पारायण प्रमुख,शिवपाठ प्रमुख,चोपदार,पुजारी आणि गाव परिसरातील सहभागी आचारी, अनुयायी यांचा विशेष सहभाग असणार आहे.आदमपूर गाव परिसरातील सदभक्तांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन समस्त गावकरी मंडळी आदमपूर यांनी केले आहे.

**जाहिर प्रगटन**
**नोंदीचा प्रकार:खरेदी**

माहिती मिळाल्याचा दि.१६/०३/२६फेरफाराचा दि.१७/०३/२६लिहून देणार:आ.वहिद आमिनशहा रा.भोकर (खाताक्र.७)यांचे गट/सर्व्हे क्र.२७ लागवडीयोग्य क्षेत्र ०.१३४५हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१४१हे. आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.हे त्यांनी सदरील गट क्र.२७ मध्ये प्लॉटिंग असून खरेदीखतावर गट क्रमांकाचा उल्लेख नसल्यामूळे अब्दूल रहीम अब्दूल वहीद यांचे वडील कै.आ.वहीद अमिनशहा यांच्या नावे क्षेत्र असून मूळ क्षेत्रातून कमी करण्यास काहीही हरकत नाही असे अब्दूल रहीम अब्दूल वहीद यांनी १०० च्या बॉन्ड क्र.६०ए.बी.२१५३८४ नोटरी रजिस्टर नं.७५ दि.०६/०३/२०२६ रोजी शपथपत्र दिले करिता नोंद घेण्यात आली मंजूरीस्तव सादर संमती देणारे खातेदार:रिहानाबेगम अब्दूल रहीम (खाता क्र.०)लिहून घेणार: सूनिता सूरेश गूजेवाड (खाता क्र.११७८४)गट/सर्व्हे क्र.२७ लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१४१हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्र.१९१७दि.०३/०९/१८ प्रमाणे रक्कम रुपये २२०००० घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्याचे नाव गाव नमूना नं७/१२वर दाखल केले. ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फेरफाराच्या नोंदवहीवरुन मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**

# औंढा नागनाथ येथे जिल्हा ग्रंथालय संघाचे अधिवेशन संपन्न

## वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

हिंगोली जिल्हा ग्रंथालय संघाचे २३ वे वार्षिक अधिवेशन व औंढा नागनाथ तालुका ग्रंथालय संघाचे पहिले वार्षिक अधिवेशन मंगळवारी (ता.१७) मार्च ला आयोजित करण्यात आले होते .यावेळी विविध विषयांवर चर्चासत्र झाले.

औंढा नागनाथ येथील जैन मंदिर येथे आयोजित अधिवेशनाचे उद्घाटन सकाळी साडेदहा वाजता अध्यक्ष खंडेराव सरनाईक यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक उपस्थित होते .यावेळी निर्मल प्रकाशनचे निर्मलकुमार सुर्यवंशी यांच्यासह मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी औंढा नागनाथ नगरपंचायतचे नगराध्यक्ष कपील खंदारे, उपनगराध्यक्ष मनोज देशमुख, प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, गुलाब मगर, तेजकुमार झांझरी, डी. बी. देशपांडे, जीवन लोखंडे, अनिल बाविस्कर, सुनिल हुसे, आशिष ढोक पाटील, डॉ. राजशेखर बालेकर, राम मेकले, पांडूरंग पाटील, प्रभाकर कापसे, राजेंद्र हंबीरे, अरविंद लंके पाटील, प्रा. विलास वैद्य, मुंजाजी गोबाडे, निळकंठ देव, शिवाजी देशपांडे, भास्कर पाठक, विष्णू पाठक आदी उपस्थित होते .

या अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात शासकिय अनुदाना शिवाय ग्रंथालय आर्थिक सक्षम करण्याचे उपाय यावर चर्चासत्र झाली .यावेळी डॉ. राजशेखर वालेकर, नामदेव दळवी, कल्याण वसेकर, डॉ. विलास खरात उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रा. विजयकुमार जैस्वाल तर सिध्दलिंग किर्तनकार यांनी आभार मानले.

अधिवेशनाचे दुसरे सत्र दुपारी एक ते दोन यावेळेत झाले. यावेळी वाचक वाढीसाठी करावयाची उपाय योजना या विषयावर चर्चासत्र झाले. यावेळी डॉ. राजेंद्र सानप, डी.बी. देशपांडे, अशोक अर्धापूरकर, गजानन शिंदे, सुधाकर जाधव, मधुकर सावळे उपस्थित होते.या अधिवेशनाचा समारोप दुपारी तीन यावेळेत झाला असून अध्यक्षस्थानी प्रा. जी. पी. मुपकलवार यांची उपस्थिती होती . यावेळी सुनील हुसे, विनोद कावडे, विश्वनाथ डोंगरे, विश्वनाथ गवारे, मारोती कदम, संतोष ससे उप-स्थित होते . वार्षिक अधिवेशन हिंगोली जिल्हा ग्रंथालय संघ व औंढा नागनाथ तालुका ग्रंथालय संघाचे डॉ विलास खरात,मारोती कदम, मधुकर सांगळे, मधुकर सावळे, संभाजी किर्तने, कानबाराव पोले यांनी केले होते. या अधिवेशनाचे सूत्रसंचालन निळकंठ देव यांनी केले. या अधिवेशनासाठी डॉ.विलास खरात, मारोती कदम, मधुकर सांगळे, संभाजी कीर्तने, मधुकर सावळे, कानबाराव पोले, विश्वनाथ डोंगरे, गजानन शिंदे,संतोष ससे, भगवान भोजे, भास्कर पोले यांनी परिश्रम घेतले. दोन्ही सत्राचे अधिवेशन संपन्न झाल्यानंतर भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

# शासकीय सेवेत सामावून घेण्याची गंगा कदम यांची मागणी

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची घेतली भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

अंध महिलांचा विश्वचषक विजेत्या भारतीय महिला संघाची उपकर्णधार गंगा कदम यांनी आ. राजु नवघरे आणि आ. संतोष बांगर यांच्या माध्यमातून शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर शासकीय सेवेत सामावून घेण्याचे आश्वासन गंगा कदम यांना दिले आहे.

हिंगोली जिल्ह्याची कन्या तथा अंध महिलांचा विश्वचषक विजेत्या महिला संघाची उपकर्णधार गंगा कदम यांचा राज्यभरात गौरव करण्यात आला. घरची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे अशी मागणी आ. हेमंत पाटील, खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी शासनाकडे केली होती. त्यानुसार क्रिडा विभागाने गंगा कदम यांच्या शासकीय सेवेत सामावून घेण्याचा प्रस्ताव दोन महिन्यापूर्वीच शासनाकडे सादर केला. मात्र या प्रस्तावावर अद्याप निर्णय घेण्यात आला नाही.

त्यानंतर महिला क्रिकेटपटू गंगा कदम यांनी आ. राजू नवघरे आणि आ. संतोष बांगर यांच्यासह उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. यावेळी गंगा कदम यांनी अंध महिलांच्या क्रिकेट स्पर्धेत विश्वचषक जिंकण्यासाठी महत्वाची भूमिका बाजवली असून त्या संघाच्या उपकर्णधार असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना सांगितले. राज्यातील इतर खेळाडूप्रमाणे त्यांनाही शासकीय सेवेत सामावून घ्यावे यासाठी क्रिडा विभागाकडे प्रस्ताव पाठविल्याचेही आ. राजू नवघरे यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गंगा कदम यांचे कौतुक करीत शासकीय सेवेच्या प्रस्तावावर अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर निर्णय घेतला जाईल असा सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे महिला क्रिकेटपटू गंगा कदम यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

# विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळावर होणार कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

सेनगाव तालुक्यातील कोळसा येथील विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत शाळेने कागदपत्रांमध्ये खाडाखोड करून आणि बोगस विद्यार्थी दाखवून ५ कोटी रूपये लाटल्याचा आरोप भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी विधानसभेत केला आहे. या प्रकरणी मंत्री अतुल सावे यांनी संबंधित शाळेची आयएएस अधिकाऱ्यामार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

सेनगाव तालुक्यातील कोळसा येथे विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळाची मराठी शाळा कार्यरत आहे. मात्र या संस्थेने कागदपत्रांमध्ये खाडाखोड करून ती नामांकीत इंग्रजी शाळा असल्याचे भासविले. तसेच मराठी शाळे-ची मान्यता एका ठिकाणी असतांना दुसरीकडेच शाळा भरविण्यात आली. या आधारे इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या राजे यशवंतराव होळकर नामांकीत शाळा योजनेचा अवैध लाभ घेतला.

सदरील प्रकरण आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी विधानसभेत लावून धरले. विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळाने मराठी शाळा असतांना कागदपत्रात खाडाखोड करून ती इंग्रजी दाखवून विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे दाखवून शासनाचे आतापर्यंत ५ कोटी रूपये लाटले आहेत. या शाळेची चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही करण्याची मागणी आ. मुटकुळे यांनी केली.

आ. प्रशांत बंब यांनी संबंधित संस्था चालक आणि शाळेतील अधिकारी तसेच त्यांना मान्यता देणारे संबंधित विभागाचे अधिकारी यांनी कागदपत्रांमध्ये खाडाखोड केल्याचे सिध्द झाले आहे तर त्यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी लावून धरली आहे.

यावर उत्तर देतांना मंत्री अतुल सावे यांनी सांगितले की, कोळसा येथील विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळाअंतर्गत शाळेने मराठी असतांना कागदपत्रांमध्ये खाडाखोड करून इंग्रजी दाखविले आहे. तसेच विद्यार्थी संख्याही कमी भरली त्यामुळे या शाळेची आयएएस अधिकाऱ्यांमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

दरम्यान, याप्रकरणी आता पंधरा दिवसात शाळेची चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश मंत्री अतुल सावे यांनी दिले आहेत.या कारवाईकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



**हिंगोली– येथील शासकीय विश्रामगृहात वंचीत बहुजन आघाडी आणि कॉंग्रेस पक्षाची संयुक्त बैठक पार पडली. यावेळी नागपूर येथे होणाऱ्या धरणे आंदोलनात सहभागी होण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्ते रवाना होणार असल्याची माहीती देण्यात आली. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही दुय्यम निबंधक कार्यालय सुरू राहणार

हिंगोली– आर्थिक वर्ष संपत येत असल्याने तसेच नववर्षाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचा मालमत्ता खरेदीकडे कल वाढण्याची शक्यता आहे. परिणामी दस्त नोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेता तसेच इष्टांक पूर्ततेच्या दृष्टीने दि. २६ मार्च २०२६, दि. २८ मार्च २०२६, दि. २९ मार्च २०२६ व दि. ३१ मार्च २०२६ या चार सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशानुसार सुट्टीच्या दिवशी सुरू असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी तसेच अभिनिर्णय, कमी पडलेले मुद्रांक शुल्क आदी कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी सह जिल्हा निबंधक वर्ग–१ यांनाही कार्यरत ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती सह जिल्हा निबंधक वर्ग–१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

### औंढा नागनाथ न्यायालयात ई–सेवा केंद्र




हिंगोली– औंढा नागनाथ येथील न्यायालय येथे पक्षकारांच्या सोयीसाठी ऑनलाइन प्रकरण दाखल करणे, शासकीय इसमाची/तपासणी अधिकारी यांची ऑनलाईन साक्ष नोंदवणे यासाठी ई सेवा केंद्राचे नुकतेच जिल्हा व प्रमुख न्यायाधीश अकालीसिंह बादल यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी दिवाणी न्यायाधीश शलाका लोमटे, न्यायाधीश प्रियंका मगर, वकील संघाचे तालुकाध्यक्ष ॲड. एस एस कदम, उपाध्यक्ष ॲड. विनोद मुखमहाले, उपाध्यक्ष ॲड.मीरा सत्वधर, सचिव ॲड. साईप्रसाद बल्लाळ, ॲड. बालाजी सानप, ॲड. विजय नागरे, ॲड. आय जे शेख, ॲड. मुंजाभाऊ मगर, ॲड .शंकर देशपांडे, ॲड. अंकुश ढोबळे, ॲड. एस डी दसरथे, ॲड. स्वप्नील मुळे, ॲड.चाजेस कदम, ॲड मंगेश सोळंके, ॲड प्रदीप लोंढे, ॲड बाळासाहेब कुटे, ॲड. प्रदीप पोले, ॲड. गौतम श्रीखंडे, ॲड. रामजी कांबळे, ॲड. विजयकुमार घनसावंत, ॲड. महेश गिरी, ॲड. एस अग्रवाल, ॲड. माधव गिरी यांच्यासह न्यायालयीन अधीक्षक कुऱ्हे न्यायालयीन कर्मचारी, वकील यांची उपस्थिती होती.

### ८२ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८२ वाहनांवर पोलिसांनी मंगळवार दि १७ मार्च रोजी विविध ठिकाणी कारवाई करीत वाहन चालकांकडून ७६ हजार ४०० रूपयांचा दंड वसूल केला आहे तसेच जिल्ह्यात दोन ठिकाणी अवैध दारू विक्री करणाऱ्यावर छापे मारून दारूबंदी कायद्यांतर्गत आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# ज्ञानियांचा राजा कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती निमित्त अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम ज्ञानियांचा राजा कार्यक्रमास प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

येथील रामलीला मैदानावरील शिवाजीराव सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यात्मिक जागर निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापूरकर, माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार, श्रीराम पांडे यांच्यासह मान्यवरांची उप-स्थिती होती. यावेळी सांस्कृतिक मंडळाच्यावतीने भक्तीगीताचा तसेच ज्ञानेश्वर माऊलींच्या ओव्या आणि गाथांवर कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, संत, नागरिकांची उपस्थिती होती.

# हिंगोलीचे भूमीपूत्र प्राचार्य डॉ काकडे उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराने सन्मानीत





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य माहिती सहाय्यक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा २०२५-२६ उपक्रमांतर्गत नांदेड विभागातून उत्कृष्ट प्राचार्य म्हणून श्री दत्त कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, हदगाव येथील प्राचार्य डॉ. डी. एस. काकडे यांना प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्राचार्य डॉ. काकडे हे कळमनुरी तालुक्यातील झरा येथील रहिवासी आहेत.

या पुरस्कार वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या सौ. वृषाली ताई किन्हाळकर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य करियर कट्टा चे मुख्य प्रवर्तक यशवंत शितोळे, भोकर विभागाचे पोलीस उपाधीक्षक हाके, डी.बी. महाविद्यालय भोकरचे प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण तसेच विभागीय करिअर कट्टा समन्वयक डॉ. सतीश चव्हाण उपस्थित होते.

याच कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रा. किशोर दवणे यांना उत्कृष्ट करियर कट्टा समन्वयक म्हणून पुरस्कार मिळाला व महाविद्यालयात सुद्धा करिअर कट्टा उपक्रम राबवणारे उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. डॉ. काकडे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल हदगाव तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कृष्णा पाटील आष्टीकर व सचिव खासदार नागेश पाटील आष्टीक यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आणि पुढील कार्यासाठी खूप शुभेच्छा दिल्या. तसेच श्री दत्त कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील प्रा. किशोर दवणे तालुका समन्वयक करिअर कट्टा, व प्रा. एकनाथ पावडे महाविद्यालयीन समन्वयक करिअर कट्टा तसेच सर्व प्राध्यापक, आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी आनंद व्यक्त करून डॉ. काकडे यांचे कौतुक केले. हिंगोली जिल्ह्याचे भूमिपुत्र म्हणून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ३० हजार भाविक एकाच वेळी मंडपात बसण्याची क्षमता, सीसीटीव्हीची करडी नजर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर गजराज बाल गणेश मंडळाच्या पुढाकारातून येथील रामलीला मैदानावर अंतरराष्ट्रीय कथाकार प. पू. भाईश्री रमेशभाई ओझा यांची श्रीमद भागवत कथा होणार आहे. या भव्य मंडपात जवळपास २५ ते ३० हजार भावीक बसतील अशी आसन व्यवस्था केली जाणार असून संपूर्ण कथा स्थळी सिसिटीव्ही कॅमेऱ्याची करडी नजर राहणार आहे.

येथील रामलीला मैदानावर मंगळवारी १७ मार्च रोजी श्रीमद भागवत कथेच्या अनुषंगाने पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी रमेश भाई ओझा यांचे अनुयायी प्रफुल दवे, प्रवीण भाई दवे यांच्यासह गजराज बाल मंडळ पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

अग्रवाल बोलताना पुढे म्हणाले, गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावार १९ ते २५ मार्च पर्यंत श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून यासाठी मुख्य यजमान म्हणून स्व. मखनलाल शंकरलाल गौड यांच्या स्मृती प्रित्यर्थ नंदकिशोर शर्मा म्हाळसा पुरवाले हे राहणार असल्याचे सांगून गुरुवारी दुपारी चार ते साडे सात यावेळेत श्रीमद भागवत कथेला सुरुवात होणार आहे. शुक्रवारी आणि शनिवार नित्य कथा, रविवारी कृष्ण जन्म, सोमवारी गोवर्धन पूजा, तर मंगळवारी रुखीमिनी विवाह तर बुधवारी २५ मार्च रोजी सकाळी साडे नऊ ते दुपारी एक या वेळेत पूर्णाहुती त्यानंतर कथा समाप्ती नंतर लगेच महाप्रसाद सुरु होणार आहे. या कथेसाठी आमदार तानाजी मुटकुळे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. दरम्यान, श्रीमद भागवत कथेसाठी सात दिवस वेगवेगळे यजमान पूजेसाठी उपलब्ध राहणार आहेत असे ही स्पष्ट केले.

गुरुवारी साडे बारा ते दीड या वेळेत भोजन झाल्यानंतर शास्त्री नगर येथून शोभा यात्रा काढली जाणार आहे. शोभायात्रा मंडपात दाखल होताच थेट भागवत कथेला प. पू. रमेश भाई ओझा सुरुवात करणार आहेत. प. पू. रमेश भाई ओझा यांच्या मधुर वाणीतून सात दिवस चालणाऱ्या श्रीमद भागवत कथेचे आस्था, धर्म संदेश अश्या विविध चॅनल माध्यमातून सरळ प्रसारण केले जाणार आहे. त्यामुळे याचा लाभ परदेशातील भावीकांना सहज घरबसल्या घेता येणार आहे.

श्रीमद भागवत कथेसाठी आलेल्या भावीकांना नास्ता, चहा, पाणी, भोजनाची मोफत व्यवस्था गजराज बाल गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आली.

# अवकाळी पावसामुळे पिके, फळबागांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

हिंगोली जिल्ह्यात मंगळवारी मध्यरात्री वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे पिकांसह फळबागांचे नुकसान झाले आहे..

मंगळवारी मध्यरात्री कळमनुरी परिसरात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाला. अवकाळी पावसामुळे आंब्याच्या फळबागांचे नुकसान झाले आहे. तसेच गव्हाचे हाताशी आलेले पीक जमीनदोस्त झाल्याचे काही ठिकाणी पहायला मिळाले.

हिंगोली तालुक्यातही वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली यामुळे आंब्याच्या फळबागा तसेच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे पहायला मिळाले आहे. वसमत तालुक्यातील काही गावांमध्येही वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. त्यामुळे गव्हाचे पीक जमीनदोस्त झाले असून केळी तसेच आंब्याच्या फळबागांचे नुकसान झाले आहे.

जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले असून प्रशासनाने तत्काळ नुकसानीचे पंचनामे करून शासनाने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्यामुळे काही ठिकाणी घरांवरील छप्पर उडाली तसेच हिंगोली शहरासह अनेक ठिकाणी मध्यरात्रीनंतर वीज खंडीत झाल्यामुळे उकाड्यात नागरिकांना रात्र काढावी लागली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# परभणी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी लता विजय वाकळे यांची तर उपाध्यक्षपद राष्ट्रवादीचे श्रीकांत विटेकर यांची निवड

परभणी जि.प.अध्यक्ष-उपाध्यक्ष निवड

**मोहन धारासूरकर**
**परभणी ,/प्रतिनिधी-** परभणी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी सावंगी म्हा. (ता. जिंतूर) या गटातील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित सदस्या लता विजय वाकळे यांची तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्रीकांत विटेकर यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे.

परभणी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी विशेष बैठक आज १८ मार्च रोजी दुपारी २ वाजता जिल्हा परिषद सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक पिठासीन अधिकारी शोभा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

नवनिर्वाचित सदस्यांच्या या बैठकीत अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव असणाऱ्या अध्यक्षपदाकरीता भाजपाच्या श्रीमती वाकळे तर उपाध्यक्षपदी महायुतीतील राष्ट्रवादीचे विटेकर यांची बहुमताने निवड झाली, महायुतीतील पक्षश्रेष्ठींनी मंगळवारी दुपारी मुंबईतून महायुतीतीलच भाजपाचा





अध्यक्ष तर राष्ट्रवादीच्या सदस्याची उपाध्यक्षपदी निवड होईल, असे जाहीर केले होते. त्यामुळेच या दोन पदांकरीता गेल्या काही दिवसांपासून सुरु असणाऱ्या घडामोडींना पूर्णविराम मिळाला. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या आदेशाप्रमाणे महायुतीतील हे दोन्ही पक्ष व शिवसेना शिंदे गट एकत्रितपणे या निवडणूकीच्या रिंगणात ऐक्याचे प्रदर्शन करतील, असे स्थानिक नेतेमंडळींनीसुध्दा नमूद केले आहे.

दरम्यान, सन २०२२ मध्ये परभणी जिल्हा परिषदेची मुदत संपल्यानंतर काही काळ प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने नुकत्याच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका पार पाडल्या. नव्याने निवडून आलेल्या सदस्यांमधून आता अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड होणार आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ तसेच संबंधित नियम १९६२ मधील तरतुदीनुसार ही निवड प्रक्रिया पार पडणार आहे. त्यासाठी शोभा जाधव यांची पिठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### मोकाट श्वानांवर नियंत्रणासाठी मनपाची विशेष मोहीम; २६ श्वान जेरबंद

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील मोकाट श्वानांचा



वाढता त्रास लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या वतीने विशेष मोहीम राबविण्यात येत असून, आतापर्यंत एकूण २६ मोकाट श्वानांना पकडून त्यांना कोंडवाड्यात जेरबंद करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या कोंडवाडा विभागांतर्गत मोकाट श्वानांना पकडण्यासाठी तीन स्वतंत्र पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या मोहिमेचा शुभारंभ काल महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख व आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या हस्ते पथकाच्या वाहनाला हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. मोहिमेच्या पहिल्याच दिवशी ८ श्वानांना जेरबंद करण्यात आले होते. त्यानंतर आज १७ मार्च रोजी आणखी १८ श्वानांना पकडून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली. पकडलेल्या श्वानांची नसबंदी करून पुढील प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती मनपाकडून देण्यात आली आहे.

शहरातील मोकाट श्वानांचा प्रश्न पूर्णतः नियंत्रणात येईपर्यंत ही मोहीम सातत्याने सुरू ठेवण्यात येणार आहे. कोंडवाडा प्रमुख विनय ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील कर्मचारी ही मोहीम प्रभावीपणे राबवत आहेत.

### नरळद शिवारात ४२ किलो गांजा जप्त; महिलेविरुद्ध गुन्हा

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड तालुक्यातील नरळद शिवारात मंगळवार १७ मार्च रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास नांदेड येथील अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई करत तब्बल ९ लाख २६ हजार ३०० रुपये किंमतीचा ४२ किलो १३० ग्रॅम गांजा जप्त केला. या प्रकरणी एका महिलेविरुद्ध गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नरळद शिवारातील चंदाबाई यादव काळे यांच्या ज्वारीच्या शेतात अवैधरित्या गांजाची लागवड व साठा असल्याची गोपनीय माहिती नांदेड येथील अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णहरी सपकाळ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मंगळवारी दुपारी साडेतीन वाजता छापा टाकला. या कारवाईवेळी सरकारी पंच म्हणून रावसाहेब जाधव, अमृत अवचार तसेच तलाठी सोनाली चौधरी उपस्थित होते. पथकाने शेताची तपासणी केली असता सुमारे ४२ किलो १३० ग्रॅम गांजा आढळून आला. हा गांजा जप्त करण्यात आला.

या प्रकरणी मंगळवारी उशिरा सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हनुमंत मानेजी जक्केवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चंदाबाई यादवराव काळे यांच्याविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक व्यंकट गंगलवाड करत आहेत.

### संतसंगतीतून आत्मिक सुखाची अनुभूती : पितळे महाराज

**सेलू,/प्रतिनिधी :** संतसंगतीमुळे आत्मिक सुख प्राप्त होते आणि ईश्वरभक्तीची गोडी लागते. संतांचे आचरण शुद्ध असून ते समाजाला योग्य दिशा दाखवतात. संत म्हणजे नैतिक मूल्ये, अढळ ईश्वरभक्ती आणि माणुसकीची सेवा करणारे थोर पुरुष असतात, असे प्रतिपादन संत बाळाभाऊ महाराज पितळे नरसिंह संस्थान (मेहकर) येथील हभप श्रीहरि पितळे महाराज यांनी केले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखी रथामागे दिंडी क्रमांक १५ चे मालक वै. ह.भ.प. गुरुवर्य बापूसाहेब महाराज वालुरकर यांच्या ३४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कीर्तनात ते बोलत होते. शहरातील समता नगर भागात १७ मार्च रोजी हा पुण्यतिथी उत्सव उत्साहात पार पडला. श्री संतांचिया माथा चरणांवरी, साष्टांग हे करी दंडवत या जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या अभंगावर आधारित सेवा यावेळी सादर करण्यात आली.

पुढे बोलताना पितळे महाराज म्हणाले की, संतांच्या चरणी माथा टेकवून साष्टांग नमस्कार केल्याने मनाला शांतता लाभते. त्यांच्या बोधामृत वाणीमुळे मनात चैतन्य आणि समाधान निर्माण होते. संतांच्या सहवासामुळे पूर्वसंचित पुण्य फळाला येते. श्रुतीसंपन्नता, ब्रह्मनिष्ठता आणि कृपाळूपणा हे संतांचे वैशिष्ट्यपूर्ण गुण असून ते नेहमी भक्तांवर कृपेचा वर्षाव करतात. ज्यांचा अभाव कधीच जाणवत नाही, अशी चैतन्यस्वरूप व्यक्तीच संत होय, असेही त्यांनी सांगितले.

## शेतकरी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध समस्या व मागण्यांच्या पूर्ततेसाठी जिल्हाधिकारी परभणी



यांना एक लेखी निवेदन देऊन मागण्या पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागणी करण्यात आले आहेत.

जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या सध्या अनेक समस्या भेडसावत असून शेतकऱ्यांच्या महत्त्वपूर्ण मागणीकडे शासनाने पाठ फिरवली असल्याने त्याचा पाठपुरावा करण्यासाठी आता सोनपेठ तालुक्यातील शेतकरी संघटना एक पाऊल पुढे सरसावली आहे याविषयी संघटनेच्या वतीने निसर्गाच्या सुलतानी संकटाबरोबरच शासनाच्या शेतकऱ्याप्रती असलेल्या दुजाभाव हरून पाडण्यासाठी विविध मागण्यांचे देखील निवेदन परभणी येथील जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले आहे या निवेदनावर पिकवीमा ट्रिगर सुरू करण्यात यावे, पिक विम्याचा जोखीम स्तर १००% करण्यात यावा या पिकविमा योजनेतील दोन प्रमुख मागण्यासह घोषित केलेला १७५०० रु पिकवीमा त्वरित मिळावा, उत्पादीत संपूर्ण हरभरा खरेदी करावा, कर्जमाफीच्या घोषणेप्रमाणे कर्जबाजारी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यात यावा,महाडिबीटी, कृषी समृद्धी योजना व कृषी यांत्रिकीकरण उपाभियान २०२५-२६ मधील प्रलंबित सबसिडी तात्काळ देण्यात यावी. या प्रकारच्या सर्व मागण्या मान्य करण्यात याव्यात अन्यथा शेतकरी संघटनेच्या वतीने संपूर्ण जिल्हाभर तीव्र आंदोलन करण्यात येईल यासंबंधीचे निवेदन देण्यात आली आहे.

## जिंतूर पंचायत समितीत अयोध्या खिस्ते सभापती-व सोनाली ताई दराडे उपसभापतींचा पदग्रहण सोहळा

**जिंतूर,/प्रतिनिधी-** येथील पंचायत समितीत भारतीय जनता पक्षाच्या नव्याने निवडून आलेल्या सभापती व उपसभापतींचा पदग्रहण सोहळा मंगळवारी (दि. १७) दुपारी २ वाजता उत्साहात पार पडला. मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित या सोहळ्याला मोठा प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर होते. त्यांच्या उपस्थितीत पदग्रहण सोहळा पार पडला.

या सोहळ्यात अयोध्या किशोर खिस्ते यांनी सभापतीपदाची, तर सोनीताई माधव दराडे यांनी उपसभापतीपदाची सूत्रे स्वीकारली. पदग्रहणानंतर माजी आमदार रामप्रसाद जी बोर्डीकर यांनी दोघांनीही तालुक्याच्या विकासासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष मानकर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन




भाजप तालुकाध्यक्ष गोविंद थिटे पाटील तसेच सरचिटणीस डॉ. पंडित दहाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य रोहित चव्हाण डॉक्टर देवराव कराळे भगवानदादा वटाणे प्रतापराव देशमुख नगराध्यक्ष सचिन गोरे गट नेते डॉक्टर पंडितराव दराडे जिल्हा सरचिटणीस गोविंद थिटे नानासाहेब राऊत प्रसादराव बुधवंत सारिका ताई बर्वे शोभाताई गावडे शिवकन्यांमध्ये वैष्णवी कुलकर्णी अशोक बुधवंत भगवानराव वटाणे बालाजी सांगळे भास्कर थिटे माधव दराडे रवी घुगे गजानन वराड विकास जाधव अंबरवाडी कर कैलास खंदारे आदी मान्यवरांची उपस्थिती होती

## पाथरी येथील रोजगार मेळाव्यास उमेदवारांचा उस्फूर्त प्रतिसाद

**मानवत ,/प्रतिनिधी:** अखिल भारतीय ग्राहक पंचायतची मानवत तालुका व शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून तालुका अध्यक्षपदी डॉ सचिन चिद्रवार तर शहराध्यक्षपदी श्याम झाडगांवकर यांची मंगळवारी ता १८ बिनविरोध निवड करण्यात आली.

शहरातील संत सावतामाळी रोडवरील डॉ सचिन चिद्रवार यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत सर्वप्रथम स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे देवगिरी प्रांत अध्यक्ष डॉ विलास मोरे



हे उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष गुलाबराव शिंदे उपाध्यक्ष भगवान करंजे व सोपानराव टोले यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. कार्यकारणी पुढील प्रमाणे तालुका कार्यकारणीत उपाध्यक्ष प्रकाश करपे, सचिव डॉ विजयकुमार कहेकर, कोषाध्यक्ष संजय बांगड, लीगल सेल प्रमुख ऍड मुकुंद पाटील, आयटीसेल प्रमुख प्रा गजानन आंबेकर, पर्यावरण आयाम प्रमुख अनंत बंडे, रोजगार सृजन आयाम प्रमुख प्रा राजाभाऊ डुकरे, प्रचार व प्रसिद्धी प्रमुख सदानंद भरड, ग्राहक मार्गदर्शन सेवा प्रमुख रामा अशी आहे.

## माजलगाव धरणाचे पाणी सोडण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी:** माजलगाव धरणाचे पाणी सोडण्याची मागणी सोनपेठ - माजलगाव धरणाचे पाणी प्रत्येकी २० दिवसांनी उजव्या कालव्यातून सोडण्यात येते. परंतु वीस दिवसापेक्षा जास्त काळ होऊनही पाणी सोडले नसल्यामुळे सोनपेठ तालुक्यातील शिर्शी चारीवरील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे. त्यामुळे तात्काळ धरणाचे पाणी उजव्या कालव्याद्वारे सोडण्याची मागणी शेतकऱ्यांच्या वतीने तहसीलदार सोनपेठ यांना करण्यात आली आहे.

माजलगाव उजव्या कालव्यातून सुटणारे पाणी शिर्शी बु. चारीने संपूर्ण सोनपेठ तालुक्यातील शेत जमिनीचे सिंचन करते. हे पाणी यावर्षीच्या रब्बी हंगामामध्ये दर २० दिवसांनी सोडल्या जाईल असे पाटबंधारे विभागाच्या वतीने सांगितले होते. त्यामुळे या कालव्याच्या शिर्शी बु. चारीवरील अनेक शेतकऱ्यांनी गहू, ज्वारी, हरभरा,बाजरी, ऊस, मका आदी पिके घेतली आहेत. यापैकी काही पिकांची काढणी झाली असली तरी उशिराने पेरणी झालेली काही पिके परिपक्व होण्याच्या प्रतीक्षेत आहेत.तर बारमाही असणारे ऊसाचे पीक उभे आहे. या पिकांना सध्या पाण्याची आवश्यकता असून उन्हाची तीव्रता वाढलेली आहे. त्यामुळे पाण्याअभावी ही पिके करपू लागली आहेत. यासाठी संबंधित पाटबंधारे विभागाने माजलगाव उजव्या कालव्यातून पाणी तात्काळ सोडण्यात यावे अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने सोनपेठ येथील तहसीलदारांना कडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

# नियमित खेळ ही उत्तम आरोग्याची गुरुकिल्लीच- जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

## परभणीत जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचा भव्य शुभारंभ

**परभणी,/प्रतिनिधी:** उत्साह, ऊर्जा आणि स्पर्धात्मकतेच्या वातावरणात जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य उद्घाटन आज श्री. शिवाजी महाविद्यालय येथे दिमाखात पार पडले. यंदा मराठवाडा विभागीय क्रीडा स्पर्धेचे यजमानपद परभणी जिल्ह्याकडे असल्याने या जिल्हास्तरीय स्पर्धांना विशेष महत्त्व प्राप्त झाले असून खेळाडूंमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला.

खेळ हा केवळ मनोरंजन नसून जीवन घडविण्याची प्रभावी प्रक्रिया आहे. खेळ हा शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य सुदृढ ठेवतो तसेच शिस्त, संघभावना आणि आत्मविश्वास वाढवतो. प्रत्येकाने दररोज किमान एक तास खेळ किंवा व्यायामासाठी द्यावा, नियमित खेळ ही उत्तम आरोग्याची गुरुकिल्लीच आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले. कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. जाधव, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, शैलेश लाहोटी, संगीता चव्हाण, जीवजराज डापकर, तहसीलदार संदीप राजापुरे यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. यानंतर आकर्षक पथसंचलन, मशाल प्रज्वलन आणि आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडून स्पर्धेचा शानदार शुभारंभ करण्यात आला. खेळाडूंनी दिलेल्या मानवंदनेने संपूर्ण परिसर उत्साहाच्या वातावरणाने भारावून गेला. जिल्हाधिकारी यांनी आगामी सण-उत्सवानिमित्त सर्वांना शुभेच्छा देत सहभागी खेळाडुंनी सर्वोत्तम कामगिरी करण्याची अपेक्षा व्यक्त केली. मागील वर्षी परभणी जिल्हा उपविजेता ठरला होता, यंदा विजेतेपद मिळविण्याचे ध्येय ठेवून सर्व खेळाडूंनी खेळाचे चांगले प्रदर्शन करावे. तसेच यंदा मराठवाडा विभागीय क्रीडा स्पर्धेचे यजमानपद



परभणी जिल्ह्याकडे असल्याने बाहेरच्या जिल्हयातून येणाऱ्या खेळाडुंना उत्तम सुविधा देण्याबाबत अधिकाऱ्यांना सुचित केले. मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर यांनी सहभागी खेळाडुंना शुभेच्छा देत उत्तम खेळाचे प्रदर्शन करण्याचे आवाहन केले. तसेच अशा स्पर्धांमधून कौशल्य विकसित होऊन व्यक्तिमत्व घडण्यास मोठी मदत होते, असेही त्यांनी नमूद केले. निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी प्रास्ताविक केले. कोणताही खेळ जिंकण्यासाठी खेळला जातो, मात्र त्यासाठी प्रामाणिकपणे आणि मनापासून खेळणे अत्यंत गरजेचे आहे, असे नमूद करुन त्यांनी २००९ साली कृषि विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या विभागीय स्पर्धांची आठवण सांगितली. यंदा तब्बल १५ वर्षांनंतर पुन्हा परभणीला हा मान मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. दि. ३ ते ५ एप्रिल दरम्यान वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या मैदानावर विभागीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून त्यासाठी जिल्हास्तरीय स्पर्धांद्वारे संघ निवड प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

या क्रीडा स्पर्धांमध्ये मैदानी स्पर्धांसह खो-खो (पुरुष व महिला), कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट (पुरुष), बॅडमिंटन (पुरुष व महिला), टेबल टेनिस (पुरुष व महिला), रिंग टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, लॉन टेनिस तसेच जलतरण अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. या स्पर्धांमधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड करून आगामी विभागीय स्पर्धेसाठी संघ निश्चित केला जाणार आहे.

आभार प्रदर्शन तहसीलदार संदीप राजापुरे यांनी केले. सूत्रसंचालन शिक्षण प्रवीण वायकोस यांनी केले. खेळ, संस्कृती आणि संघभावनेचा सुंदर संगम अनुभवत परभणी जिल्हा आता विभागीय स्पर्धेसाठी सज्ज झाला असून, या स्पर्धांमधून नव्या उर्जे चा आणि जिद्दीचा संदेश संपूर्ण प्रशासनात पसरताना दिसला.